

रविकिरणमण्डळाचें २३ वें पुस्तक

# स्वप्न - रञ्जन

माधव जूलियन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. ५१४६
REFBK-0005146
REFBK-0005146

पुणें

आर्यसंस्कृति मुद्रणालय

कविवर्य ताम्बे यांचा ६१ वा वाढदिवस,

ता. २७ नोवेम्बर, १९३४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
स्था. क्र. ५१४६
ठाणे (महाराष्ट्र)

माझ्या जन्मस्थानांतील

म्हणजे

बडोदें नगरांतील

**संस्मरणीय व्यक्तींना**

आणि

**घटनांना**

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं.
ता. ........
ठाणें.

# प्रस्तावना

'स्वप्न-रञ्जन' हें रविकिरणमण्डळाचें २३ वें पुस्तक आहे. यांत 'गज्जलाञ्जलि' व सुनीताञ्जलि वगळून उरलेल्या बहुतेक स्फुट कविता सङ्कलित केल्या आहेत. क्रमाङ्क २२,२३ व ११२ हीं गोल्डन् ट्रेझरींतील क्र० २१९, २१८ व २८० यांचीं भाषान्तरें आहेत. क्र० २८० चें मीच पूर्वी केलेलें भाषान्तर, भाषान्तरप्रक्रियादृष्ट्या ताडून पहाण्यासाठीच पुढे दिलें आहे.

पाहिलें अनीला प्रथम तिच्या बालवयीं
ती हसरी सालस गमली मज त्या समयीं.
जणु उषाच होती स्मित अपुलें उधळीत
वासन्त हिमाची सुन्दरता दावीत.
गुल्छबू-गुलाबादि तिचे तैं खेळगडी,
ती तरल-चित्त, अव्याज तयांसम अगदी. १
पाहिली पुन्हा मी ती सुकुमार कुमारी,
वर्षांची अठरा काही अजब खुमारी !
सौन्दर्य आणि मन विकासतां युवतीचे
विलसती मुखावर रङ्ग नवे नवतीचे,
चन्द्रिकाच शोभे, भाषण म्हणजे गाणें—
बहु करिती हेवा, एक धन्य प्रेमानें. २
लोटलीं यावरी वर्षांमागुनि वर्षें;
पायारी तिचिया उभा राहुनी हर्षें
देखिलें कळीचें फूल, फुलाचें फळ तें—
मातेच्या जवळी बाळ एक कोमळ तें.
तो रुबाब, तें सौन्दर्य आणि पोक्तपणा
—वाटला योग तो अपूर्व माझ्या नयनां. ३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ५१७६
ठाणे शाखा (स्थळ प्रत)
मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. काव्य नं. ११०
ता.
मराठी ग्रंथ संग्रहालय
नों. नं. ७१४२

# स्वप्न-रञ्जन

## १ मुरली

[ जाति अक्रूर ]

श्रीकृष्णा रे, आस न दुसरी उरली,
ये घुमव मधुर तव मुरली. ध्रु०
क्षण दीपवुनी होशी दृष्टीआड
अन् वरिशि मूकता द्वाड.
स्वरसङ्गम तो, तगमगतो हा जीव,
वाजीव गडे वाजीव !
ये वरस पुन्हा तो रम्याद्भुत राग,
ये फुलव झुलव दिल्बाग.
हृदयाच्या सखयावीण
संसार सदाचा शीण !
दे जीवन हृद्य नवीन,
किति वर्षांची हौस अजूनि न पुरली,
ये घुमव मधुर तव मुरली. १

तव रूपाचें स्वप्नहि पडलें नव्हतें,
पण वेडच जडलें तंव तें.
मज या लोकीं तूच अेक अभिराम,
तुजमधेच कामविराम.
    कां मारा हृदय अुपाशी
    परलोककल्पनापाशीं !
    घ्या हिमकण कां मधुपाशी !
हीं भोक्तृत्वें तुझ्याच साठी अुरलीं—
ये घुमव मधुर तव मुरली. ४

सर्व सुखांची प्राप्ति
गोपिका

मज देव नको माझा तू अधिदेव,
दे जुळ्या जिवाची खेंव.
ज्या मित्राच्या भवती हे ग्रहगोल
नाचती सावरुनि तोल,
अन् अवकाशीं अेकच घुमुनी नाद
अुमटवी मनीं पडसाद,
    रङ्गूनि विश्व रासांत
    जडतेवर होअी मात,
    तो तूच चहुकडे नाथ !
दे शान्ति मला रासभ्रमणीं मुरली,
ये घुमव मधुर तव मुरली. ५

तू पूर्वयुगीं मुरलीच्याच सुराने
भारिलीं खिलारें, रानें.
त्या नादानें साध्या भोळ्या गोपी
हरि-हृदयीं गेल्या झोपीं.

सरस रमणीयार्थांचें गे सुवर्ण अकिञ्चन
कवि पिकवितो होतां रामादृगमृतासिञ्चन.

ता. २१ जानेवारी १९१२]

स्थळ सं. काव्य ता. ठा. मराठी ग्रंथ संग्रहालय ७९७४

## ३ चिमुकली शान्ता

[ जाति अञ्जनी ]

सोड अकालिक लाज सोनुले, सोड अकालिक लाज् ध्रु०

हृदयकवाडें झालीं उघडीं,
हाक मारिते प्रीति हरघडी,
खेळ हिशी चल झिम्मा-फुगडी;
खेळ-वय तुझें, खुल्या अङ्गणीं नाच, खिदळ तू आज्. १

केस मोकळे-छे, घन काळे
बालरवीवर टाकिति जाळें,
मागे सारित ते लडिवाळे,
उजळ दश दिशा दृष्टि फेकुनी बेडर कुर्रेबाज्. २

नेत्र न, शाळिग्राम साजिरे
हिमस्नात किति निर्मळ गहिरे !
कटाक्ष नच हे तर शुचिरुचिरे,
दवबिन्दुच, मोदाश्रु अुषेचे रम्य तरल अव्याज् . ३

रानझरा लहरी झुळझुळतो,
विजनाशी तो कलरव जुळतो,
बोल तसा तव या हृदिं खुलतो,
चोरुं नको गा ! तुझा कोवळा लाडिक हा आवाज्. ४

गोविंदाग्रज प्रेमाचे शाहीर



प्रेम तुझ्यावरचें हें माझें मधुरच नित्य रहातें,
अजुनिहि आहे परन्तु झालें कटुतम सत्वर हा ! तें,
दूर राहुनी नकळत तुजला तुझीच करितां सेवा
भाग्याचा तो कुणिहि निघेना ? मला न शिवता हेवा.
मला कल्पनास्वर्गीतिल तू तिलोत्तमा गमतीस,
कधी न शिवती हीन भावना पार्थिव दुर्दम जीस.
स्मित आधी, मग खुलें बोलणें, नन्तर तें हितगूज,
मागुनि आठी, तुटक बोलणें, मौन रुचे नित तूज.
आण घेतली तू, मी केलें अभिनन्दन कवनांहीं,
आज साङ्गशी "कीव वाटली, प्रीति कधी लव नाही."
भलें जाहलें आत्मनिवेदन ! – दिव्यच मम भक्तीचें !
कशास घालूं ओझें तुजवर नवीन विज्ञप्तीचें ?
प्रीतिपरीक्षा नको, कीव तव नको, नको भिक्षाही !
प्रेमापायी पुरे मिळाली जन्मठेप शिक्षा ही.
जीवित म्हणजे स्वप्न मनोहर, विलसित विश्वासाचें !
नको प्रबोधन असलें नीरस सन्तत निःश्वासाचें !

ता. ११ मे १९१३ ]

# ५ निसर्ग आणि मी

[ सुनीत, वृत्त पृथ्वी ]

निशा दश दिशांत या भरुनि शान्तता राहिली,
भरे शिशिर अन्तरीं, ढग न अम्बरीं, कम्बल.
न वायुहि फिरूं शके, स्थिति अशी न मी पाहिली,
निशेस विलसवि हें जग निजे, पडे निश्चल

निसर्गहृदयक्रिया जणु गमे पडे बन्द ती,
असे अमर तो परी, परम योग-निद्राच ही !
मनुष्यहृदयें किती अशिं सुखामधे स्पन्दतीं ?
नकोच दुरि जावया, मजसि जागवी आच ही.
प्रिया कधि धरील हें शिर अुरावरी दाबुनी,
म्हणेल मज, रे नको विरहभीति ती दारुण ?
कितीक दमलास तू फिरुनि येअुनी लाम्बुनी !
जरा पड, नसे दुरी मधुर मङ्गलाशारुण.
निसर्ग, तुजला नसे मम सहानुभूती मनीं,
अशान्त विरहार्त मी, सुखित शान्त तू मीलनीं.

सप्टेम्बर १९१३ ]

## ६ श्यामा–रजनी

[ वृत्त वियोगिनी ]

सखये, रजनी तुझ्यापरी
दिसते श्यामल आणि सुन्दर;
किति ही सुखशान्त रागिणी !
परि तू–हाय कितीक अन्तर ! १

करिती गगनांत तारका
नयनांचा तव मूक मत्सर;
दुरुनी मज या खुणाविती,
परि कोडेंच तुझ्या मुखावर. २

झिणमीण करी दुरी दिवा,
मज तो फक्त दिशाच दाखवी,
न अुजेड कुठे पडे पथीं,
भवती कीर्र करी घनाटवी. ३

निजलीं तरुकोटरांमधे
अथवा चञ्चल डाहळीवरी,
अपुल्या घरट्यांत पाखरें–
मज अेकासच जाग ही वरी. ४

विसरूनि दिनास लोटल्या
गवती टोळ अिथेच झोपतो,
अितका जरि नीच हा किडा,
मजहूनीहि सुखी निकोप तो. ५

निजली असशील तू प्रिये,
मृदु शय्येवर आपुल्या गृहीं,
कुठलें तुज शीत त्या स्थलीं !
कुठली गे मनिं काळजी, दुही ! ६

परि मी फिरतों भिरीभिरी,
मज दे सङ्गत रात्रिकीटक;
फुलबाग दुरी फुले, फुलो;
सलतो सन्तत येथ कण्टक. ७

ता. २० सप्टेम्बर १९१३ ]

मराठी ... स्वतः प्रत ... सं. ... ता. ... ठाणें.

का ध्येय दूर गेलेलें
    परत ये गाढ झोपेंत ?
मग राहिन अपुली आता
    मी झोप सदाची घेत !
पण झोपहि गाढ न येअी
    जरि मरतें कामाखालीं,
ये प्रभो, झाक हे डोळे,
    गाडून टाक पाताळीं !

आक्टोबर १९१३ ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ... नोंद नं. ७११२ ... ठाणें.

## ८ मुलाचा प्रश्न

[ जाति अुद्धव ]

" बघ बाळ, चन्द्र वर येअी
    रात्रिचा सोनुला खासा — "
तों " कुठून मी मग आअी ? "
    बोलली बाल-जिज्ञासा.

. . .

अङ्गणीं लाडका खेळे
    आअीचें बोट धरूनी,
दुडदुडा कोकरावाणी
    बागडे मधूनि मधूनी;
पाहूनि मुखींचीं मोत्यें
    हो चान्दण्यांस आनन्द,

कापशी ढगीं विधु धावे
त्याकडे दृष्टि वर जाअी,
तों बाळ अधीर म्हणे की
" का तेथुनि आलों आअी !
चल बोलव त्याला पाहूं,
नाहीतर आपण जाअूं,
चान्दण्यांशि खेळत राहूं !"
तो वरच बघे, ही सोडी
थाम्बूनी लाम्ब अुसासा. ३
" चल बाळ जाअुं झोपाया,
निजण्याची झाली वेळ.
चान्दण्यांसङ्गती खेळूं
सारेच कधीतरि खेळ. "
अैकूनि बाळ झणि जाअी
सोडूनि शान्त फुलबाग
माडीवर शयनमहालीं
आअीच्या मागोमाग.
तो पुढ्यांत बिलगुनि पडला,
झोपेंत तत्क्षणीं गढला;
मातृजीव बन्धीं अडला;
परि बसुनी स्वप्नविमानीं
ये जाअुनि आत्मनिवासा. ४

ता. ८ फेब्रुवारी १९१४ ]

जळ खोल, ढगाळ अम्बर,
अुठवी चञ्चल वायु त्या जळीं
तनु वीचि तसाच भङ्गुर
तव हा केशकलाप काजळी. ६

तव भावुक, मन्द, मोजकें,
मधु, निष्पाप, सलज्ज भाषण—
भरल्या जणु मोहळांतुनी
मध खाली ठिबके क्षणक्षण. ७

हृदयांतिल माधुरी तुझ्या
बहिरङ्गावरुनी कळूनि ये,
दुरुनी सुख हो जरी अुणें
न परीक्षा बघणार मी प्रिये. ८

ता. ६ ऑगस्ट १९१४ ]

## १० स्वप्नांतील स्वप्न

[ जाति साकी ]

भलत्यावेळीं कोण वाजवुनि पाही टिचकी दारीं ?
चोर ? हृदयही नाही जवळी; का ये कुणि कैवारी ?
दार लोटुनी चन्द्राचा का प्रकाश हा मधि झुकला ?
पण ही छायामूर्ति कुणाची ?–“ वाट कुणिकडे चुकलां ? ”

. . . .

प्रिये निष्ठुरे, हृदय अगोदर तू आशामय केलें,
आणिक नेलें ताट ओढुनी जंव तें प्रेमभुकेलें.
पुन्हा कल्पनाम्बरीं अुडवुनी कातरिले मम पङ्ख,
खाली पडतां, ‘ अधःपात हा ! ’ म्हणूनि केला डङ्ख.

रोष निमाला, पूर्वीची ती गेली दुष्ट असूया,
बघ नव जीवित ! पहाटतारा अुगवे, अूठ हसूं या ! ”

. . . .

हाय ! परी स्वर्गीय तरी तें होतें स्वप्नच सारें !
फसवुनि छळिशी असा नववयीं, दैवा दुष्ट कसा रे !
ता. २६ ऑक्टोबर १९१४ ]

ग्रंथ स्थळ सं. ता.

## ११ निशिगन्धाचीं फुलें

[ जाति केशवकरणी ]

ज्या निशिगन्धीं जीव लोभती दोघांचे आपुले
सहज हीं देशीं त्याचीं फुलें. ध्रु०

लावितात या रौप्य कुटिलमुख सनया वायुस पिसें,
रागरव काढुनि सौरभ-मिषें.
जिवन्तपणिं मी समाधि घेअीं बन्द करुनि चहुकडे,
बुजवुनी हृदयाचेही तडे.
हेर तुझे पण कोठुनि शिरले न कळे त्यांनी परी
पाडिलें महाद्वार अन्तरीं.
आडवूं केवि मी ! विजयी तव लोचनें !
लक्ष्मीस यावया ‘ नको ’ कोण हो म्हणे ?
देअूळ भग्न हें तुझेंच गे शोभने !
पण तू येशी जाशी, आजहि अशाच लहरीमुळे
अर्पिशी प्रसाद म्हणुनी फुलें. १

मी कान्तारीं कण्टकशयनीं पडें अेकलेपणीं,
न लागे पापणीस पापणी.

## १३ कुमारी पिरोजा

[ जाति पादाकुलक ]

सुशुभ्र पाठीवरुनी लोम्बे
सैल तिपेडी वेणी धूसर,
लाल फितीच्या आगवळाची
गाठ रुन्द किति चमके सुन्दर ! १
तलम मल्मली तगरशुभ्र तो
तङ्ग झगा आजानु तनूवर,
अुठाव अपुला त्यांतुनि दावी
गोण्डस बान्धा प्रमाणसुन्दर. २
दिसे कसा सुकुमार अुन्च हा !
हालचाल रमणीय पहा की–
पवनें लवुनिहि सरूतरू जणु
अूर्ध्वसरलगति सन्तत राखी. ३
तुरळक तुरळक झग्यास झालर,
ती साधेपण अधिकचि खुलवी;
श्रीमन्तीचें हें साधेपण
सदभिरुचीला केवि न झुलवी ? ४
काळ्या जाळीच्या मोज्यांतुनि
विलसति हिमसित जङ्घा सुन्दर,
येतां मौक्तिकधवल मत्स्य ते
जसे गहनजलिं जवळ जवळ वर. ५
अुन्च निमुळत्या टाचेचे ते
बूट घालुनी शाद्वल-भूवर

किती विकसले गुलाब गालीं !
अिरमबाग जणु बाला झाली !
छटा फुलौरी जरी ही हिची,
तरी अजुनि ती लज्जालाली
मूक सङ्कुचित मधु प्रीतिची
नाही शिवली हिला अकालीं. १३

खेळाडूपण मुक्त मनाचें
चमके नयनीं, विहरे वदनीं;
मोकळिकीच्या आनन्दाचें
लास्य विशद हें मौक्तिकरदनीं. १४

सतेज मुक्ता रम्य हुर्मुजी,
का ही गाथेमधली कविता !
ज्ञान मधुर जें हिच्या हितगुर्जी
गाथेसहि ये काय शिकवितां ! १५

रस्त्यानें मी जातां जातां
थबकुनि बघतां ती मधुमूर्ती
सहज भेटले डोळे चारी,
हृदिं अवतरली काव्यस्फूर्ती. १६

दृष्टि काढुनी परि मजवरुनी
फिरे कुमारी ती निजतन्त्रें,
अुभा जेथल्या तिथे परी मी
भारियलेली अनुक्तमन्त्रें. १७

ता. २८ आक्टोबर १९१५ ]

किती विकसले गुलाब गालीं !
अिरमबाग जणु बाला झाली !
छटा फुलौरी जरी ही हिची,
तरी अजुनि ती लज्जालाली
मूक सङ्कुचित मधु प्रीतिची
नाही शिवली हिला अकालीं. १३

खेळाडूपण मुक्त मनाचें
चमके नयनीं, विहरे वदनीं;
मोकळिकीच्या आनन्दाचें
लास्य विशद हें मौक्तिकरदनीं. १४

सतेज मुक्ता रम्य हुर्मुजी,
का ही गाथेमधली कविता ?
ज्ञान मधुर जें हिच्या हितगुजीं
गाथेसहि ये काय शिकवितां ? १५

रस्त्यानें मी जातां जातां
थबकुनि बघतां ती मधुमूर्ती
सहज भेटले डोळे चारी,
हृदिं अवतरली काव्यस्फूर्ती. १६

दृष्टि काढुनी परि मजवरुनी
फिरे कुमारी ती निजतन्त्रें,
अुभा जेथल्या तिथे परी मी
भारियलेला अनुक्तमन्त्रें. १७

ता. २८ आक्टोबर १९१५ ]

हीं नयनें का चन्द्रकान्तरसपूर्ण शान्त हीं तळीं
जयांच्या यशोधवल हिमजळीं
शामी झेनोबियासारख्या दोन श्यामसुन्दरी
विलसती डौली बदकापरी !
नर्मद्युतिची लकेर करितां नर्तन येथे क्षण
चमकती कसे हिऱ्याचे कण ?—
लावण्ययुक्त थडकतां नर्मदाजळ
निशिं घाटीं अुतरे जणु तारा-मण्डळ !
हे कटाक्ष देअुनि सुख करिती विव्हल,
नेत्र बदामाकार कधि असा चमत्कार दाविती
यांस पण जन सालस भाविती.

तप्त रूक्ष पण संस्कारक्षम कोमल भूमीवरी
मृगाच्या पडतां काही सरी
अन्तर्वैभव वरती ये नव सतेज जणु पाचुचें—
पुनरपि नव वय न कुणा रुचे ?
तें झालें या हृदीं जंव तुझे मृगलोचन वर्षले,
हुरळलें हृदय खुळें हर्षलें !
परि मग आर्द्रांना कां नच आला द्रव ?
नित दिसे ढगांचें शुष्करङ्गलाघव,
न स्वातिहि वळली, होय न तिज आठव,
न हो जिवाचें सोनें जरि ती दसऱ्याची ये मिती,
नेत्र हे तव मुख अन्वेक्षिती.

आणिक कोजागरी अहा ती पवित्र सुखशीतल !
सुधा तंव न्हाणी अवनीतल,

काव्य ... सं. २५ ... ता. ...

मुरलीरव अैकुनी मधुवनीं प्रीतियोगसाधिका
हो जशी कम्पित ती राधिका !
या दिव्य देहिनींना येअी अैकुं का
तव गान चित्तहर ! का भ्रम मज हो फुका !
प्रेमाकुल मानस सहज करी या चुका–
झुळूक परिमळ हरी तशी हृद्भाव गीतलहरि ती —
मोहिनी परि तू वाग्यत किती ! ७

ता.२३ आक्टोबर १९१६]

## १५ निराशेंतील समाधान

प्रेम कुणाचें मजवर नाही हें खडतर दैव,
असे हा तथापि आनन्द;
असती कोणी ज्यावर माझें प्रेम सर्वथैव,
न त्याला काही निर्बन्ध.
मी न भिकारी, हृदयीं माझ्या प्रेमाचा साठा
लुटा हो लुटा सन्धि हीच !
पळूं नका मोकळ्या तुम्हाला जरी दहा वाटा,
नसे हा कोठवळा नीच.
प्रेम करीं मी, दगड नसें हें नसें काय काही !
लोटली ही अमृतगङ्गा,
शोण कुठे, यमुनाहि कुठे या भलत्या शङ्कांही
कां करूं हिच्या वृत्तिभङ्गा !
हृदयजे, वहा खोल सन्थ
नसो तुज कसलीही खन्त;

प्रयाग येतां होअिल सङ्गम, आक्रम निजपन्थ,
अडुं नको, नको म्हणूं 'हन्त!' १

रत्न निपजलें तें भूगर्भीं पडे अन्धकारीं,
येअी वरी गारगोटी;
रविकिरणें चुम्बितीं तिशी, कुतुकतीं मुलें भारी,
प्रतिष्ठा परि ती का मोठी?
साधी वाङ्मोहिनी सहज जो असा रसाळ कवी
स्वस्थळीं राही अज्ञात;
चन्द्रशेखरा, तव कविता-रति परी मला झुकवी
फुलाला जसा अुषावात.
रसिक नसेना कुणी? जन्म ये मला गुलाबाचा,
स्वतःला कां लेखूं तुच्छ?
ख्रिस्तशिरीं बैसला म्हणुनि का कण्टकमुकुटाचा
होअिल कधी सुमनगुच्छ?
विहङ्गम होअुनि गाअीन,
साद जरि दे वनराअी न,
अिन्द्रधनूस न बघे अभागी कुणी दृष्टिहीन
म्हणुनि का वैभव तें दीन? २

मजवर नाही प्रेम तुझें हें सखे, जाणतों मी,
नको तू पुनःपुन्हा साङ्गूं.
पडली आहुति या जीवाची प्रेमाच्या होमीं
आणखी काय दुजें मागूं?
म्हणती प्रभुने निम्रूदाच्या भव्य अग्निकुण्डीं
निर्मिली बाग थण्डगार,

अदाह्य अिब्राहीम मधोमध, देवदूतझुण्डी
भोवती करीत सञ्चार.
न मी प्रभुप्रिय, मी प्रेमपिसा अणू अणू जळतों !
यांतही समाधान वाटे;
अेकतानता परी भङ्गतां आत्मा कळवळतो,
फुलांचे मग बनती काटे.
तथापि न माझा आक्रोष,
जरी तू देशि मला दोष.
वायुरूप होअूनि करिन मी नित्य तुझा घोष,
मला कीं त्यांतच सन्तोष ! ३

ता. १० ऑगस्ट १९१७]

## १६ चूकामूक

[ जाति अुद्धव ]

ध्यानाचा भङ्ग न व्हावा
लाविलें म्हणुनि मी दार,
मग अिष्टदेवताप्रतिमा
पूजिली घालुनी हार,
वाजतां कुठे पाचोळा
शापिली खोडकर खार !
ये ध्येयमूर्ति सुखदायी,
मम दार लाविलें पाही,
अन् तशीच परतुनि जाअी—

ग्रंथ संग्रह स्थळ २८.११ सं. काव्य ता. डा जं.

## १७ गोड शेवट

[ जाति दिण्डी ]

अजुनि युवती-गालास लाजवील
　　असा पाटल तव रङ्ग हे गुलाबा !
स्वार्थसाधू परिवार कठिण काळीं
　　तशा बघती त्यजुं पाकळ्या तुला बा ! १

गड्या, कोठुनि आलास पहा कोठे,
　　हाय दबुनी चुरलास पुस्तकांत !
सूक्ष्म अुरला तव गन्ध परी माझ्या
　　शान्ति वितरी या भ्रान्त मस्तकांत. २

स्नान करुनी ठेवुनी अङ्ग ओलें
　　खात झोके होतास मन्दवातीं,
भाव अपुला वाटीत विनामोलें
　　सृष्टिभक्तांना मधुर सुप्रभातीं. ३

नेत्र-सम्भाषण गोड तुझें माझें
　　थाम्बवूनी मज मित्र मम म्हणाला;
व्यर्थ झुडुपावर सुमन हें विराजे,
　　पहा खुडिलें मी, साङ्ग तर कशाला ! ४

ओळखेना छे, रसिकता न तूज,
　　केशपाशीं कुसुमच्या खोवणार.
स्फूर्ति पावुनि ती स्वीय हृदयगूज
　　काव्यमालेमधि सरस ओवणार. ५

अुत्तमाङ्गीं तुज ठेविलें असेल,
　　तिनें त्याचे ऋण फेडिलें स्मितांनी;

हसुनि हसवावें, रञ्जनीं रमावें,
काळ येतां धूळीस मिळुनि जावें. १२
बरें सुमना ! मज कळे तुझा हेतू,
कविश्रेष्ठांची सङ्गतिहि न नीच;
अशा सुहृदांसह दिव्य शान्ति घे तू,
ग्रथित करितों तुज काव्यसरीं मीच. १३
मुक्त सुमना, तुज शेवटीं पहा ही
युयुक्षूंची लाभली जशी जोड
तशी लाभो मज, नको अन्य काही,
गोड शेवट, मागील सर्व गोड. १४

ता. २९ ऑगस्ट १९१८]

## १८ माझी अिन्दुबाला

[ जाति केशवकरणी ]

पहा वर नभीं स्वयम्प्रकाशी निश्चळ तारा किती
खुणेचे दृग्शर मधु टाकिती.
अगणित या पळबिन्दु ज्यापरी कालमहासागरीं,
वा जसे भानुकिरण अम्बरीं,
अथवा जैसे किरणामधुनी तरङ्गणारे अणू,
अणूपरि मज या तारा जणू !
मजवर सत्ता गाजवायला मजला नलगे कुणी,
चित्त घे अिन्दु अेक वेधुनी.
कलाधीन ही असो, क्रमणपर असो, नसो निर्मल
–सुधा ही दे परि मज शीतळ.

मराठी ग्रंथ संग्रह
स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........
ठाणें.

बग्दाद अिङ्ग्रजी झालें,
रे प्रभूचीच घटना ही !
देवाज्ञा शीर्षी धरणें
अिस्लाम अन्य बघ नाही.
पाचवा मुहम्मद तुर्की,
नृप जॉर्ज पाचवा पाही !
अेकाची सरली शाही
दुसऱ्याची फिरली द्वाही.
क्रान्तीचें फिरतें जातें,
राष्ट्रपीठ होअुनि जातें,
काळतोण्ड खातें त्यातें;
तू परी मुक्त अविनाशी !
कां भिअूनि बहकुनि जाशी ! २

हा सदा पवित्रच आत्मा,
शारीरिक किल्बिश सारें !
अल्लाचे आपण अवघे
त्यालाच मिळूं माघारे.
तो करीम कनवाळू तो
तो क्षमाशील गफ्फार,
तत्क्षमेस कार्य असावें
म्हणुनि हा पाप-करभार.
या विरोधिनी भक्तीस
प्रेरिता तोच जगदीश !
नर जणू वायुवर पीस.

जरि फिरवी काळ रहाट
दर्वेशी अेकच थाट,
हे चिदानन्दसम्राट !
दिसण्यांत कलन्दर दीन प्रेमवेडे
त्यापुढे शिकन्दर हीन ! ५

या द्रवीभूत अग्नीला
प्राशुनी पवित्र बनावें,
तें मदिर नयनिंचें पाणी
दृग्शरीं ओढुनी प्यावें,
प्रेमवायु शिरतां अङ्गीं
अद्वैत गूढ साधावें,
जननयनिं धूळ फेकाया
मधुगीत द्व्यर्थी गावें;
मग- गुरुप्रसादावीण
प्रेमपन्थ फार कठीण;
बसुं नको परि अुदासीन.
चल वस्त्रें ठेव गहाण
पण मधुची शमव तहान. ६

ही पहा कला सृष्टीची—
मधुवात फुलवि ओसाडी;
भाळुनी प्रफुल्ल गुलाबीं
बुल्बुलहि मधुस्वर काढी.
जाणीव नेणिवेची घे,
मधुविद्या शिक आनन्दी,

स्थळ प्रत
सं. ......... नं. .........
ता. ......... ३७
ठा.जं.

## २० कुणी काय बान्धिलें

तेज पाहतां याचें दिपते होउनि जाते मूक गिरा,
कोहिनूर जणु ! अद्वितीय हा कला-किरीटांतील हिरा.
रवितापाने वितळेना जर हिममन्दिर मी यास म्हणूं,
कर्पूराचें कसें ! गन्ध नच, न जाय उडुनी अणू अणू.
उदात्त जणु मन्दार-मण्डपीं बघे स्वप्न मधु वास्तुकला,
कुराणवचनाक्षरी हार हा जिच्या गळां न पहा सुकला.
पुण्य कुणाचें असें रूप घे हृदयङ्गम सङ्गमरवरी !
शान्ति मनाला पावे येथे, मृत्युहि शोभा अमर वरी.
यमुनातीरीं कीर्तिकुञ्ज हा बघतां साक्षात् काळ म्हणे,
“ धर्म नको मज माझा, नलगे यापुढती अथवा जगणें. ”
काय नवल जर आले सोडुनि यक्ष सौधमय निज नगरी
जीतें बाह्योद्यानस्थितहरशिरश्चन्द्रिका धौत करी !
स्मारक धन्य ! प्रीति धन्य ही ! धन्यच राणी मुम्ताज !
चिरनिद्रेचें स्थान तिच्या हो मन्दिरराज असा ताज !
यवनीप्रिय-कवि-रसगङ्गेचा पडे फिकाच अिथे नखरा !
दिल्लीवल्लभ शहाजहान् ! तू जगन्नाथ दयितेन्द्र खरा !

भस्म चर्चुनी कृष्णमूर्ति हे कोण अुभे जागोजागीं !
बैरागी का सुकाळले जे हिन्दुस्थानीं हतभागी !
गाम्भीर्याचे वा स्थैर्याचे पुतळे भव्य, सदैव खडे,
यांच्या डोळ्यासमोर झाले कितीक तख्तांचे तुकडे !
हतबल यांच्या पुढे जाहले सृष्टींतिल राक्षस सगळे—
गाठ पडे निःस्पृह शूराशी तंव सत्वर बळि-गर्व गळे.

राजयोग जनकाचा नाही भाकड गोष्ट पुराणींची
रहस्य दावी अितिहासींची कथा अहल्याराणीची.
काञ्चनगङ्गा वाहवूनि जी अुभवि यशाचा धवलगिरी
होळकरकुलप्रभा, कोण हो तत्स्मृतिला न धरील शिरीं ?

प्रेक्षणीय हे हौद पर्वतीवरी कुणि गर्वें दाखविती,
आणि कशाचे आणुनि चित्तीं भोजनपर्वें आठविती.
पक्वान्नांचे म्हणतां येअी अजुनिहि तद्गन्ध त्वरित—
या दुष्काळीं महाभोजनस्मरणहि होअी रसभरित !
थू थू त्याच्या राजवटीवर ज्याचें स्मारक हेंच असें !
बघुनि मराठी हृदय भग्न हो, अुपहासें जग बघुनि हसे.
लाडुबहादुर, कामान्धातुर, वाक्चतुर परी जो बाजी
भेकड पाजी, महाल-गाजी, करी पुण्याची शोभा जी !

कुणी काय बान्धिलें पाहतां दिसतो क्रम अितिहासाचा,
अन्ध सदा नर, विमार्ग दिसला स्पष्ट जरी किति ऱ्हासाचा !
ता. ६ अेप्रील१९१९]

## २१ असो स्थिर तुझा हृक्सन्देश

तुजपासुनि मी असतां दूर्
लागे हृदयीं नित हुरहूर् ,
नयनीं अुत्कण्ठेचा पूर्,
क्षणोक्षणीं ज्या अुठती शङ्का त्यांनी होअी अन्तर चूर्. १

वर बघ उघडुनि नेत्र विशाल्,
बघुं दे मज हृद्रङ्गमहाल्
भ्रमवी मज किति मोहनजाल्,
प्रेमाभिक्षु मी, भ्रमुनी थकलों, थोडी तरि मज भिक्षा घाल् ८

असला पुण्यप्रीतिनिवास्
सदा मिळावा या जीवास् ;
व्हावा याचा येथ विकास् —
प्रिय रमणीच्या पुढे कोणती गे दुसरी पुरुषाची आस् ? ९

मुखकुड्मल तव हें कां बन्द् ?
लपवायाचा तुज कां छन्द् ?
सोड प्रणयोद्गारसुगन्ध्,
कण्ठ सोकला, दे मज चाखूं निदान शब्दाचा आनन्द् ! १०

सोड सोड नयनांतुनि बाण्,
विद्ध हृदय कर, घेईं प्राण्,
शङ्कांचें बघ हें थैमान्—
सोडुनि आश्वासनास्त्र अपुलें कर गे यांची दाणादाण्. ११

प्रियकर तव हा बघ निष्काम् !
नाम तुझें घे, न पुसे दाम्,
माझ्या हातुनि तू घे काम्,
पुरुष भिईना कष्ट कराया, निथळो निढळाचा या घाम्. १२

सहानुभूतीचा तव वात्
भरो फिरो मम हृदयशिडांत् ;
हेलावत जावो दिनरात्,
इष्ट तडीला परी शेवटीं लागो तारू धक्के खात्. १३

मराठी ग्रंथ संग्रहालय स्थळ प्रत ४३

## २४ अङ्गाअी

[ जाति अक्रूर ]

निज नीज अता आनन्दा लडिवाळा,
अङ्गाअी माझ्या बाळा. ध्रु०

बघ रस्त्याला ओस करी ही रात्र,
जागती दिवे हे मात्र.
या बाजूला कुठुनि अता मोटार
पों कुर्र शद्व करणार ?
तो विलायती कुठुनी आणूं बाजा ?
माझेंच अैक पद राजा.
मी हेंहि हळुहळू म्हणतें,
जणु अपुल्याशी गुणगुणतें,
शेजारीं कोणी कण्हतें
त्या झोंपूं दे, तूहि झोप ये बाळा,
ये मलाहि बघ कण्टाळा. १

परि जाशी तू झोपीं गाढ दुपारीं,
अन् छळिशी आता भारी.
किति माझे हे डोळे चुरचुर करिती,
तुज कोठे ओळख परि ती ?
अन् त्यांचाही खाअुनि साधा गोळा
नुक्ताच लागला डोळा.
तों तुला अुजाडे, छान !
अगदीच खुळें हें ध्यान !
बघतां मम हरपे भान

आकाशाच्या चाळणीतुनी खाली
जो प्रकाश शारद गाळी
वर येअी तो मिरवित अपुली शोभा
हा बाळमित्र चान्दोबा.
हा मामाच्या वाड्याकडुनी आला,
चल जोड हात तू याला.
        सोन्याचा चेण्डु पहात
        चिमुकले करिशि वर हात,
        किति कौतुक हें डोळ्यांत !
जरि धडपडशी यास धराया बाळा,
शिवशील केवि आभाळा ? ५

ग्रंथ संग्रह
स्थळ प्रत
नं.
सं.
ता.

मज आअीने हेंच नभाचें लेणें
दाविलें असेल मजेने,
भरवित अिवले काअुचिअूचे घास—
रुचि काय तिच्या प्रेमास !
त्या प्रेमाची गोड गहन अुत्कटता
या हृदयीं आता पटतां,
        हा स्मारक बाल्यसुखाचा
        हा स्मारक मातृमुखाचा
        हा साक्षी मधुकुतुकाचा,
नभिं बघतां मी परिचित या चन्द्राला
ये हृदयीं भाव-अुमाळा. ६

कां आअी, गे होय असें पुनवेला ?
अुलझ्ली स्मृति हृद्देला;

वात्सल्य तुझें निःस्पृह अक्षय आओी,
मी होअुं कशी अुतराओी !
दायांश तुझ्या हृदयाचा
जो मला मिळाला त्याचा
मधु लुटो जीव हा माझा !
गेला झोपीं, जडता ये पायाला,
अुचलूनि ठेवितें बाळा. ९

ता. ८ सप्टेंबर १९२०]

## २५ तो क्षण

क्षण आहे का तो तव हृदयीं ! ध्रु०

बसलों होतों बोलत गोष्टी अन्धुक ताम्बुस त्या समयीं; १
अैकित होतिस तू 'हूं' बोलत, चित्त न लव परि त्या विषयीं. २
अुठलिस वेगें खुर्चीमागे जाअुनि लवलिस सहज तओीं. ३
तुझ्या निरर्थक शब्दीं तों किति सुरस अुचम्बळला प्रणयी ! ४
मग कां झडकरि दूर जहालिस शङ्कित, भयकम्पित विनयी ! ५
भिडले चारी डोळे रमणी क्षणच अहा त्या प्रीत्युदयीं ! ६
धन्य करी मज अजुनिहि ती स्मृति, तारी प्रेमाच्या प्रलयीं. ७

ता. ३० जानेवारी १९२१ ]

वात्सल्य तुझें निःस्पृह अक्षय आअी,
मी होअुं कशी अुतराअी !
दायांश तुझ्या हृदयाचा
जो मला मिळाला त्याचा
मधु लुटो जीव हा माझा !
गेला झोपीं, जडता ये पायाला,
अुचलूनि ठेवितें बाळा. ९

ता. ८ सप्टेंबर १९२०]

## २५ तो क्षण

क्षण आहे का तो तव हृदयीं ? ध्रु०

बसलों होतों बोलत गोष्टी अन्धुक ताम्बुस त्या समयीं; १
अैकित होतिस तू 'हूं' बोलत, चित्त न लव परि त्या विषयीं. २
अुठलिस वेगें खुर्चीमागे जाअुनि लवलिस सहज तअीं. ३
तुझ्या निरर्थक शब्दीं तों किति सुरस अुचम्बळला प्रणयी ! ४
मग कां झडकरि दूर जहालिस शङ्कित, भयकम्पित विनयी ! ५
भिडले चारी डोळे रमणी क्षणच अहा त्या प्रीत्युदयीं ! ६
धन्य करी मज अजुनिहि ती स्मृति, तारी प्रेमाच्या प्रलयीं. ७

ता. ३० जानेवारी १९२१ ]

## २७ कौमार्यस्मित

[ जाति केशवकरणी ]

पुलाजवळ वळणावर चमकुनि चपलेपरि सुन्दरी,
दाविशी स्मित अद्भुत पळभरी. ध्रु०

पुढले आखुड केस काजळी कुरळे क्रीडातुर
तरङ्गति वाऱ्यावर भुरभुर;
टवटवीत या वदनीं खेळे वृत्ति सरळ मोकळी,
चिमुकली डाव्या गालीं खळी.
विशाळ डोळ्यामधे विनोदी चमक खोडकर भली,
खुले मुखिं बारिक मुक्तावली.
तव बुद्धितेज अुपजवी भयादर अुरीं,
सङ्कोच घालवी लाडिक जिवणी दुरी,
लोचनांत सन्ध्याग्रहकौतुकमाधुरी !
दृष्टिक्षेपें करिशी पावन आणि शान्त अन्तरीं,
दाविशी स्मित अद्भुत पळभरी. १

चार दिसांची ओळख, कधितरि चार शब्द बोललों,
क्वचित् कधि डाव दोन खेळलों.
मी न सगासोयरा, न मी विख्यात कुणी मोहरा--
जुअी तू मी न परी मोगरा !
ओळखीस जागशी, माधुरी भरली हृदयामधी,
सहज ही वाहे जेवी नदी.
धिटुकले, हासुनी बघशी माझ्याकडे,
कुणी बघेल हें भय न तुज, परि मला पडे.
मज कळे जनमनीं अेकच ये—वाकडें !

संसार जगाचा चालविशी तू बापा,
मी स्वतःचसाठी खपुनि टाकितों धापा,
तू सर्वशक्तिमान् सिन्धु तुला भेवया
मी विन्दु धडपडें, शोषी मज ही माया,
जें प्रेम अनिर्वचनीय तेंच तू देवा,
मी कुठे अनुभवूं ! कशी करूं तव सेवा !

[ २ ]

प्रेमाची गङ्गा क्षमाशील जी आओ
तन्नेत्रीं, ओष्ठीं, स्तनीं तुझी नवलाओ.
अनसूया माता पदवी किति ही मोठी !
साकार ओश्वरी त्रिपुटी येओ पोटीं.
पोरकें पोर मी रडतों धाओ धाओ,
मी करूं कुणाच्या माण्डीवर अङ्गाओ !
खेळूनि गुदगुल्या करूं कवण जीवाला !
गाळूनि अश्रु मी आणुं कुणास ओमाळा !
सम्पली चढण ही, वृथा अता ती आस—
परि व्हावें बालक, रुचे हेंच जीवास.

[ ३ ]

ती प्रेमळ करडी दृष्टि गुरूची शान्त
हो व्यक्त तुझें परिपालन योग्य तिच्यांत.
दिनरात दोन परि काळ ओक,त्या रीती
कधि बने क्षमा, कधि शिक्षा त्याची प्रीती.
ओपजवी भीति लव, अत्यादर, विश्वास,
आपुल्या सारिखें करूं झटे शिष्यास.

ग्रंथ संग्र... स्थळ प्रत नं. ता. ठाणें
...ग्रंथ संग्रहालय दा. क्र. ५११...

दिनकरा, अुगव ये, ओळख दे तव देवा,
घे सेवा अन् दे सान्निध्याचा ठेवा.

ता. २६ ऑगष्ट १९२१ ]

## २९ हास बालिके !

हास बालिके, गडे, अुधळ सुख निकें ! ध्रु०

काहि नको कारण तुज
फुलवाया वदनाम्बुज—
बोल मुकें तव हितगुज, अुघड माणिकें. १

तव नयनीं सुख-कौतुक,
जिवणी कशि अर्धोत्सुक,
मुग्धपणांतिल दे सुख, अुजळ मौक्तिकें. २

खेळगडी तूज पवन,
चिमणीही गाअि कवन,
घर हें तुज नन्दनवन, मुक्त सारिके ! ३

करुनी दिनभरहि कष्ट,
तुज बघतां शीण नष्ट;
पडतें मम दैव दुष्ट तुजपुढे फिकें ! ४

स्मारक तू प्रीतीचें,
चित्र हुबेहूब तिचें,
जीवन गतकालींचें तुजमधे टिके. ५

ता. १४ नोवेम्बर १९२१ ]

व्यक्तीचें माहात्म्य घालवी असा नियम कां हवा
कुणाला लोकवटा ? वाहवा !
नीतिकटाक्षहि फक्त लैङ्गिक क्षेत्रापुरता असे,
धर्मही भेदच शोधित बसे.
भिन्न मतांच्या स्वकीयांस या स्वतन्त्रता कासया
हवी ती जैशी परक्यांस या ?
विद्यार्थिदशेमधि जहाल जे ते किती !
तोण्डांतुनि कुलपी गोळे जे फेकिती,
होऊनि थण्ड मग राजदास्य सेविती,
स्वस्थ होउनी शिळोप्यास परि म्हणति, 'देश पेटला !'
महात्मा काय करिल एकला ? ३

घेउनि सत्यप्रीतिअहिंसा यांचा झेण्डा करीं
सञ्चरे गान्धी देशावरी.
खादी पटका, त्यावर चरका; अर्धा उघडा गडी
तोण्ड दे जुलुमाला हरघडी.
सान थोर रञ्जले गाञ्जले यांना हृदयीं धरी
योग हा अनासक्तिचा वरी.
हा क्रान्ति कराया झटे राज्यधोरणीं,
हा पुढे सरे की प्रथम मी पडो रणीं;
हा हिरा न फुटणें, हाणा घण ऐरणीं !
भूतदयेचा सागर अथवा म्हणा दिसे चेवला—
महात्मा काय करिल एकला ? ४

न लगे शिष्यप्रपञ्च, होणें गुरु वा पैगम्बर,
मानवी किती थोर अन्तर !

म. ग्रं. स्थळ प्रत
नं. ५७
ता.
ठा. ग्रं.

## ३१ खुळी लाजरी पोर

[ जाति अञ्जनी ]

काय लाजरी पोर ! खरोखर खुळी लाजरी पोर् ! ध्रु०
चिमण्या तोण्डीं घास भरविले,
अङ्गाखान्द्यावर खेळविलें,
गाउनि गाणीं तुज जोजविलें,
मागे सरशी ती तू लाजत अन् माझ्याच समोर् ! १
आणि नेसुनी चोळी परकर
खेळ खेळलिस मजसह सुन्दर,
तऱ्हेतऱ्हेच्या फुगड्या गरगर—
शिकविलेंस तू, होतिस तेव्हा कैशी दङ्गेखोर् ! २
तोंच कळीचें फूल विकसलें,
हृद्य वसन्तोद्यानच हसलें,
लाजुनि लाजुनि का परि असलें
हें मधुवैभव चोरायाचा राहिल मधुकर चोर् ! ३
पढित लाज चल टाकुनि दे ही,
अुषःप्रभा तू पसरी गेहीं,
दाव चपलता जी तव देहीं,
नाच रेशमी पातळांत या जेवी प्रमुदित मोर् . ४
पोटाशी तुज बळें आवळुनि
केसांतुनि तव अङ्गुलि फिरवुनि,
गालींचे हे गुलाब खुलवुनि
म्हणतों नेवो रसिक तुज कुणी, प्रेमळ पण शिरजोर् . ५

[ता. २८ डिसेम्बर १९३१]

# ३२ कवितेचें देणें

[ जाति चन्द्रकान्त ]

मला अेकदा चित्र काढुनी दिलें कल्पनेने
दरिद्यास या दुसरें कुठलें प्रेमाचें देणें ?
दश वर्षें कण्ठिलीं चित्र तें हृदयाशी धरुनी,
गजबजलेली जगती गमली न मग अुजाड सुनी.
प्रतिमा ठेवुनि ती हृदयाच्या गाभाऱ्यामाजीं
ध्येयाला त्या किती वाहिलीं काव्यफुलें ताजीं !
भास दिव्य तो प्रसन्न होअी मज पुढती मूर्त,
नभास माझे हात पोचती, राजा मी तूर्त ! १

स्वप्नांतिल अुर्वशी कशी ती आज अिथे आली ?
मादकतेची ललित छटा ती कुठे हिच्या गालीं ?
अुषा म्हणूं तर झगमग कोठे ? ती रङ्गे प्राची,
हिचिया नयनीं शुक्राची द्युति, वदनीं चन्द्राची.
शरच्चन्द्रिका चन्द्रावाचुनि ही रमते कोठे ?
बावरलों, मुखचन्द्र न कळला आश्चर्यच मोठें !
तगरशुभ्र नेसुनी मल्मली पातळ चन्देरी
अुषेस लज्जित करी, क्षौम जी नेसे सोनेरी. २

डौलदार सुकुमार देखणा शेलाटा बान्धा,
मोल न करवे त्या वेषाचें अितका तो साधा.
पोलकेंहि बेतीव रेशमी कट्युत्तर अङ्गीं
खुलवुनि दावी तनुसौष्ठव तें फिकट पीतरङ्गी.

होय निरुत्तर तर गोन्धळुनी किति सुन्दर हासे,
मुरका मारुनि रोखी दृष्टी अुत्कट अुल्हासें.
घाऱ्या भोळ्या डोळ्यांतुनि या मग गम्मत चमके,
प्रतिपक्षीही स्वपक्ष विसरे, क्षणभर तरि थबके. ६

वाट निराळी फुटे जिथे तें येअी कल्याण,
नमस्कार मग ते घाअीचे हलवित सामान.
कोण कुणाचे कुठले ? हो पण अन्तर कोन्दट कां ?
औट घडीची सङ्गति सोडी लावुनि ही चटका.
नावहि न कुणी कुणास पुशिलें — घोर किति चूक !
स्वप्नसुखाच्या स्मरणें जीवा, शान्तव ती भूक.
दिधलें तों स्मृतिचित्र काढुनी प्रेमळ कवितेने—
अभाग्यास या दुसरें कुठलें लाभावें देणें ! ७

ता॰ २ आक्टोम्बर १९२२]

## ३४ सवत

केला निश्चय की बघेनच छबी आहे कुणाची अशी
की न्याहाळित तीस नित्य बसती निःश्वास सोडीत ते;
ते गेल्यावर मागलें स्मरुनि तें पस्तावतें मी कशी !
माझ्या नीचपणास निन्दित अता तप्ताश्रु मी ढाळितें ! १

मेजाचे खण शोधिले बघुनिया नाहीत की ते घरीं,
होती ती प्रतिमा तिथेच—परि ती माझीच होती बरें !
प्रेमें काढविली यदा चमकलें वासन्तिका सुन्दरी !
काळाने नव्हते तदा खरडिले माझ्या कपाळीं चरे. २

## २६ रागिणी विधवा

[ जाति दिण्डी ]

जीव तळमळतो, कुठे खरी प्रीती ?
जीव तगमगतो, काय लोकरीती ?
जिवा, तुजविण का ओस मर्त्य-लोक ?
जिवा, जातां तू कोण करिल शोक ? १

जों न कळलें सौभाग्य तों निमालें,
अितर रडतीं बघुनीच रडूं आलें;
खुल्या वातावरणांत शिक्षणाच्या
क्वचित् छाया आल्यास त्या क्षणाच्या. २

दिवस थिल्लर खिदळण्या-खेळण्याचे,
निरनिराळीं पुस्तकें घोकण्याचे,
कल्पनेचे प्रासाद अुभविण्याचे
खुळ्या कर्मठ पोरींस हासण्याचे. ३

फिरत असतां टेकड्यावरी आम्ही
पुढे धावत कल्पना स्वैर नामी;
आणि विद्यार्जनदशा जणु अुषा ती
अहो सन्ध्या वाटते अता रातीं. ४

तदा म्हटलें होअीन रमाबाअी,
समाजाच्या सेवेंत किति नवाअी !
दुष्ट रूढींची आणि कायद्यांची
शृङ्खला ही अबलांस हाय जाची ! ५

खोल हृदयीं चळवळे मग निराशा,
पडे हातांतुनि गळुनि ‘ तर्कभाषा’.

क्षणापासुनि त्या राहिलें न हूड,
कोण हुरहुर मम जाणणार गूढ !
मान करुनी वर पाहवें न लोकीं
मग्न झालें मी काहितरी शोकीं.

पुस्तकांचा जरि पसरला प्रपञ्च
अर्थ न दिसे परि मला परमिदञ्च;
आणि दिसतां अबलाच मी अनाथ
नको जाणें वाटलें समाजांत. १३

न्यूनतेची जाणीव सदा जाची
मीहि दैवाचें साह्य तदा याचीं;
दीन दुबळी जाहलें आणि भ्याड,
दिसे आशा ती मृत्युच्या पल्याड ! १४

गमे नाही सुख पुढे जर कपाळीं
रसिक नवतीची फुकट ही नवाळी !
गुप्त झुरणीचे, बेगडी स्मिताचे,
दीर्घसूत्री हे दिवस जीविताचे ! १५

दुक्ख पोरीचें जाणणार माय
दृष्टि ठेवी ती पगारींच हाय !
चोरटें हें मग दुक्ख कथुं कुणाला ?
काय वाऱ्याला ? काय पुस्तकाला ? १६

कुठे भित्री दृष्टि ती जरि ती किंवेची—
कुठे प्रीतीच्या शान्त जाणिवेची ! २२

निराशेच्या अुठतात मनीं लाटा,
सले पूर्वस्मृतिचा न जरी काटा,
प्रश्न पुढती परि सदा—कुणासाठीं !
ध्येय कोठे तें मूर्त ! कधी गाठी ! २३

अन्तरांतुनि वर फुटे रसोद्रेक,
करूं कोणावर तयें सदभिषेक ?
आर्यपुत्राला कवण आत्मदान
करुनि साधूं अिहसख्यसुखनिधान ! २४

धर्मकामार्थी सप्तपदी साची
समत्वाने सहकारिता द्वयाची;
कुठे पुरुषोत्तम हाय परी माझा,
सखा प्रेमळ, गुरु, दास आणि राजा ? २५

ज्ञात नाही का कोण, काय नाव ?
मना किति रे तू भ्याड आणि साव !
म्हणूं तुजला मी खुळा वा शहाणा ?
नाव घ्याया का हवा तुज अुखाणा ! २६

वाममार्गें केव्हा न जावयाचा
मन प्रेमळ अन् चतुर जो वयाचा,
नवाअीने घे जनीं अग्रमान,
आद्य पङ्क्तीं तो, कोण त्यासमान ! २७

सं. ........ ता. ........ ६९.... ता. ........ ठा गं.

कशी बोलूं ! मज कल न ती कळेना;
सभ्य विनयी ते करिति परी दैना. ३३

वायु लहरी तर मुका सोनचाफा,
मेघ रडवा दवडील तोण्डवाफा !
आणुं कोठुनि मी सखी चित्रलेखा !
जगीं अबलांची गतिच कठिण देखा ! ३४

असुनि सन्निध आहोंत दूर दूर,
अशा विरहाचा मूक रागसूर;
करुनि हिय्या हुकल्यास हृदयभङ्ग !
आणि म्हणतिल जन, 'नवे काय ढङ्ग !' ३५

लौकिकाची परि लाज कशाला ती,
प्रेमसौख्याची जरी होय माती !
नसे संशयसिन्धूस तळ, न तीर—
जरि न अश्रूविण त्यांत अन्य नीर. ३६

होय म्हणतां ते स्वर्गलाभ येथे;
परी जर का क्षण सोडुनी दयेते
स्पष्ट हासुनि म्हणतील ' शक्य नाही ' --
तूच वेडी पण तुज न कळे काही. ३७

ता. २४ ऑगस्ट १९२३ ]

रागिणी उच्चवर्गाची नायिका,
क्रांतिकारक कविता. स्त्रियांबद्दल सहानुभूति
व्यक्त करणारी

स्थळ प्रत
सं. ........ नं. ......६९....
ता. ........
ठाणे.

कशी बोलूं ! मज कल न ती कळेना;
सभ्य विनयी ते करिति परी दैना. ३३

वायु लहरी तर मुका सोनचाफा,
मेघ रडवा दवडील तोण्डवाफा !
आणुं कोठुनि मी सखी चित्रलेखा !
जगीं अबलांची गतिच कठिण देखा ! ३४

असुनि सन्निध आहोंत दूर दूर,
अशा विरहाचा मूक रागसूर;
करुनि हिय्या हुकल्यास हृदयभङ्ग !
आणि म्हणतिल जन, 'नवे काय ढङ्ग !' ३५

लौकिकाची परि लाज कशाला ती,
प्रेमसौख्याची जरी होय माती !
नसे संशयसिन्धूस तळ, न तीर—
जरि न अश्रूविण त्यांत अन्य नीर. ३६

होय म्हणतां ते स्वर्गलाभ येथे;
परी जर का क्षण सोडुनी दयेते
स्पष्ट हासुनि म्हणतील ' शक्य नाही ' --
तूच वेडी पण तुज न कळे काही. ३७

ता. २४ ऑगस्ट १९२३ ]

रागिणी उच्चवर्गाची नायिका,
क्रांतिकारक कविता. स्त्रियांबद्दल सहानुभूति
व्यक्त करणारी

अमृताने सृष्टि न्हाली,
चन्द्रिकेचें क्षौम ल्याली,
हा हिजवर अुधळे चूर रुप्याचा का हिम का कापूर ! २

अिन्दु आनन्दाश्रु गाळी,
श्यामलेच्या चारुभाळीं
मधु खिन्न फाकतो नव नवरीच्या आनन्दाचा नूर्. ३

दुग्धगङ्गा गुप्त गगनीं,
अुत्सवीं या येअि भुवनीं—
ये अधान्तरीं हा सरितेवरुनी लोटत पाण्डुर पूर् . ४

शैलशिखरीं शुक्र न लपे,
कृत्तिकांचा पुञ्ज हरपे,
हो ब्रह्महृदय तो फिकट, होअुनी जाअी व्याध चुकूर् . ५

अन्धुके ती गर्द झाडी,
जींत नगरी झोप काढी,
परि दिवे फिकट ते, खडा पहारा करणें त्यांस जरूर् . ६

शुक्र टाकी नजर मागे,
अस्तगिरि अन् अुतरुं लागे,
हिण्डतों टेकडीवर रेङ्गाळत मीच चिन्तनीं चूर् . ७

सृष्टि अगदी शान्त होअी,
जाय झोपीं वायु तोही,
वेताळ मनींचा न निजे– छे, पण रात्रिचाच हा शूर् ! ८

कातळाच्या वर पडावें,
चान्दणें हें पाङ्घरावें,
आणखी करावें काय हराया हृदयींचें काहूर् ! ९

सूर तों हे कुठुनि येती ?
अन्तरींचा ठाव घेती—
छेडितें कोण हें सारङ्गीवर वागीश्वरिचे सूर् ? १०

जवळ आले, स्पष्ट झाले,
दूर गेले, लुप्त झाले,
जीवास लावुनी अधिकच चटका गेले—गेले दूर् ! ११

हाय ! माझें ध्येय का तें
गूढ दुरुनी गीत गातें ?
निर्भरालिङ्गनाविण न भरे पण माझें मन दुष्पूर् ! १२

ता. २० जानेवारी १९२४ ]

## ३९ कञ्चनी

कञ्चनी रसरङ्गाची खाणी,
शेकडों हृदयांची ही राणी
लागली गावया सहज पाखरावाणी. १

आधिच गोड जनानी गळा
कोवळा खुले, चढे मोकळा,
त्यांतून वश हिला सङ्गीताच्या कळा. २

साधें गीत किती हृत्सङ्गी !
साथ करि चुरशीनें सारङ्गी,
घे तान भिङ्गरीपरी झर्र तन्वङ्गी. ३

पायीं पैंजण रुमूझुम् छुमती,
बोलहि थकथय थक्थय अुठती,
ध्वनि रम्य अभिनयें विशद करी ही सुदती. ४

तनू ही सडपातळ गुल्छडी,
घवघवे सुरत पाक फाकडी,
नादांत तरङ्गे जशी नभीं वावडी. ५

दावी किति नाचांत चलाखी !
झगमग खेळे मग पोशाखीं,
गिर्कीस विकासे घोळ, झळकती वाकी. ६

कान्ति तर सोनें बावनकशी,
कञ्चुकी नील, साज गुल्बशी,
—अुल्काच अवतरे ही किंवा अुर्वशी ! ७

धीटच्च परि भलती भ्रूलीला
न रुचे अशा नृत्यवल्लीला;
या विशाल नयनीं दिसे कलाच सुशीला. ८

दिव्यांचा लखलखाट माण्डवीं,
वायुही गीतगन्ध साठवी,
रङ्गली किति सभा नृत्यगानलाघवीं ! ९

हृदयें अेकवटुनि या कालीं
हलती शान्तपणें वरखाली,
पण लाट अुसळुनी पडे समेवर टाळी. १०

मराठी ग्रंथ संग्रहालय

झाली जिवाची चाळण,
धीर चालला गळून
बण्डखोर तारुण्याचें
रक्त नसोनसीं नाचें;
परी क्षीण माझ्या मनीं
आस कोठे सञ्जीवनी ?

२ पुस्तकींच्या माणकांच्या
व्यवहारीं होती काचा
व्योमचुम्बी कल्पवृक्ष
होती कोळपून रूक्ष
कल्पनेच्या स्वर्गातून
खाली आदळे तरूण
पूज्य येथे अेक माया
तिच्यावीण सारी माया !
कृपा तिची होअी तर
पङ्गु अुलङ्घी डोङ्गर !
मुका होअी बृहस्पति,
मिळे पाप्याला सद्गति !
सर्व शक्तींची जननी
हीच भवींची तरणी.

३ मर्दे अव्हेरिले हिला,
आता प्रभाव पाहिला
आता पाहिला प्रभाव
काही लागेना निभाव
सत्ता करी तेंच सत्य
माना वाकविणें पथ्य
जरी पीडा दे कायदा
न्याय त्याला प्रेमें वदा
लोक-रावी येथे ओठीं
हाव सुल्तानीची पोटीं.
प्रेम सुवर्णाच्या मागे,
धन जोडी जीवधागे.
धूळ झाली येथे ध्येयें
आणि वेदान्तप्रमेयें.

४ विकूनिया स्वत्वमणी
नको साम्राज्यरमणी !
राहो शुद्ध अन्तरङ्ग,
होवो आकाङ्क्षांचा भङ्ग,
बन्द होअूं द्या वाजणें
थोरवीचीं शहाजणें
विस्मृतीच्या गङ्गेमाजी
नामदीप लोटा आजी
दोन दीस करमाया
नको गुलाम्याची माया
मग काय हवें तरी
हेंच कळेना अन्तरीं.
आंत बाहेर हें सुनें
वाटे नको नको जिणें !

भस्म माझ्या केसावरी
काय त्याची चिन्ता परी ?
माझ्या जीवीं खोल भूक
शमवाया तूच अेक
तुझ्या बोलाचाच भात
करी शान्त जगतांत
शान्तिहीन दिसन्दीस
जीव होअी कासावीस

ताअी माझी तू धाकुली
माझी अुरली माअुली
नको थोर स्वतन्त्रता
दे ग बाळपण अता
दूर करो जग मला
म्हण परी तू आपला
हात धरून ने झणी
मज वैकुण्ठभुवनीं !

ता. २६ जुलै १९२४ ]

## ४२ रसिकास

[ जाति मुद्रिका ]

हें साधें भोळें गीत आवडे तुला,
सङ्कोच, भीति कां येथे ?
घे पुरवुनि तव हेतुला. १

ये आंत, बैसुनी जवळ हृदय कर खुलें,
नच अुपचाराची बाधा,
सर्व हें समज आपुलें. २

ही गड्या, न माझी मुळी काव्यसम्पदा,
ही कृपा गूढ शक्तीची,
म्हण तीस " धन्य शारदा ! " ३

## ४३ सङ्गमोत्सुक डोह

[ छन्द ]

अेकत्र गुम्फून जीवित-धागे
प्रीतीचें नर्तन नाचलें मागे
अेकटा अुभा मी तेथे
भोवती शोधीं प्रियेतें;
न दिसे कोठे; का सोडून गेली ?
लोपते का कधी प्रीति अुदेली ! १

दृष्टीस पडे हें भयाण मात्र
रेताड कोरडें अुथळ पात्र !
प्रिया न जर सङ्गतीं
तर हो कुण्ठित गति.
प्रीति या हृदयीं अथाङ्ग खोल
तुडुम्ब भरली परन्तु फोल. २

कोणी ये, हिणवी, "भावना मेली
हासेना बोलेना करीना केलि !"
खट्याळ वादळी वारा
दौडत येतां भरारा
अुठती चञ्चल बाह्य तरङ्ग,
अन्तरीं जडता न पावे भङ्ग. ३

जीवनज्योत न माझिया गेहीं
म्हणून हें कृष्ण वसन देहीं;

म्हणत मङ्गल जङ्गलगान,
कड्याहून खाली लोटून प्राण,
होअून काषायरङ्ग,
सङ्गांत पूर्ण निस्सङ्ग,
पावूं गे समाधिसागरीं अनन्त !
—अजून सम्पेना वैशाख हन्त !

ता. ११ ऑक्टोबर १९२४ ]

ग्रंथ संग्रह
स्थळ प्रत
सं.
ता.

## ४४ माझें माहेर-सासर

[ अभङ्ग ]

कन्या सासऱ्यास जाअी
मागे परतून पाही
डोळे वळोत बापुडे
पाय जातातच पुढे
आसवांच्या भिङ्गांतून
पुढे रम्य ध्येयखूण
सय मागील ती गोड
गोड पुढीलाची ओढ
पोटीं नवलाअी, आस
आणि भाबडा विश्वास
दिला करून नवरा
जाय हौसेने त्या घरा
पाणी अुल्लङ्घी शेवटीं—
आअीबापें अैल तटीं ! १

कां न होअी अैसें मला !
कां न ओढिशी प्रेमला !
सङ्कटींच सय व्हावी
—कां न गूढ हौस ठावी !
लागून तो गोड छन्द
व्हावा मङ्गल आनन्द
शिर तुझ्या वक्षावरी
हेलकावे ते संसारीं
व्हावी मायेसवें गोड
तुझ्या सान्निध्याची जोड
अङ्गीं नाही आता त्राण
सोसायला ओढाताण
कां न होशी विश्वम्भर,
तूच माहेर-सासर ! २

ता. १५ जून १९२५ ]

मृत्यूची न तुम्हांस भीति, तुमची श्रद्धा असे ठाम ही–
ऐश्वर्यंच , हुतात्म होऊनि जगा वा येथ भोगा मही. ५

भोगैश्वर्य नसे निषिद्ध अिथलें, सेवूनि ही माधुरी
बेहेस्तांत पहा बहात्तर पुन्हा नेत्राभिरामा हुरी–
रौप्याङ्गी, चिरयौवना, विधुमुखी, कस्तूरिकाकुन्तला,
मत्ताक्षी, सरुयष्टि, हारितगती, पीनस्तनी, पेशला. ६

औत्सुक्यें बघतात वाट वर त्या स्वर्गीय पाटस्थलीं
जेथे बुल्बुलपङ्क्ति पाटलसुमाभावीं न अस्वस्थली;
द्याया मद्य पवित्र ओतुनि तिथे सौन्दर्यवान् भृत्य ते
लालित्यें पुरवूनि हौस तुमची होती कृतकृत्य ते. ७

मध्यस्थी तुमची करीलच नबी, शङ्का पहा यांत ना;
अल्ला फेकिल काफिरास तपनीं द्याया महा यातना;
सारासार तुम्ही विचार करितां अन् दावितां साहस,
शौर्यें ‘ दीन् ’ म्हणतांच दीन दुनिया होअी तुम्हाला वश. ८

हिन्दुस्थान न राष्ट्र, खास तुमची ही भोगभूमी असे,
अैशाराम मिळे अिथे खचित तो त्या शाम-रूमीं नसे;
कोणा क्षत्रिय सुन्दरी नृपसुता मर्यम् झमानी वरी !
–त्या श्रेष्ठासच जो स्वराज्य पसरी या हिन्दुभूमीवरी. ९

· · ·

ता. १४ जुलै १९२५ ]

मुसलमान धर्माची स्तुति करून हिंदु धर्मातील उणीवा दाखविल्यात्या व मुसलमा धर्मातील काही भावना आमच्या धर्मात

३ घाली अुडी तो दाण्डगा,
धरी शेळीला लाण्डगा,
लोक गोळा झाले बघा,
मौजबघे.

४ होअी बाला ती बेशुद्ध,
लोक अुभे हतबुद्ध !
— मेल्या आअीचें का दूध
प्याले होते !

५ दूध वाघिणीचें प्याले,
तरी शेळपट झाले !
मोठ्या व्यवस्थेने चाले
स्वत्वरक्षा !

६ तिची धोक्यामध्ये अब्रू
अेकाचीही चढे न भ्रू
अुभे सुसंस्कृत गब्रू
वेषवीर.

७ तों ये लङ्गोट्या अडाणी,
अशिक्षित कोणी प्राणी
परी डोळ्यामध्ये पाणी
पौरुषाचें.

८ अङ्गीं तारुण्याचा जोम,
प्याला सन्तापाचा सोम,
दीन शान्ततेचा होम
केला झणी—

९ येतां निर्वाणींचा क्षण
पाही कोण परिणाम !
विसरावें देहभान
हाच धर्म.

१० गेला कोपून कल्पान्त,
हाणी छातीवर लाथ
घाली नरडीला हात
त्या पशूच्या.

११ स्त्रीची रक्षायाला लाज
पुढे त्वेषाने ये आज
नरीं तोच नरराज,
धन्य तोच.

१२ अुडी सङ्कटीं घेअील
ठोसे खाअील देअील
वेळीं कामास येअील
तोच धन्य !

१३ आले कायद्याचे दूत,
आला अुद्धारांना अूत,
कोणी म्हणे, “ खरा पूत
माय व्याली. ”

१४ पडे पुण्ड गतप्राण,
मुक्तिदाता बन्दीवान !
नरहत्या न लहान
गुन्हा जाणा.

१५ म्हणा पुरुषाला पुण्ड,
करा कैद किंवा दण्ड,
परी तुम्ही सारे षण्ढ
वीर तोच.

१६ आता बालेला त्या टाका,
धर्म सनातन राखा !
काय धर्माची पताका
फडके वा !

१७ जा व्हा दुबळ्यांचे काळ
घोटा गुण्डांपुढे लाळ
कां न नरकाचा जाळ
जाळी तुम्हां ?

१८ नाही अङ्गामध्ये राम,
रामासाठी कां सङ्ग्राम ?
" राम बोला भाअी राम !
राम गेला ! "

ता. २० ऑगस्ट १९२६ ]

## ४८ अैकव तव मधु बोल

[ जाति चन्द्रकान्त ]

अैकव तव मधु बोल कोकिळे, अैकव तव मधु बोल् ध्रु०

नकोत मजला मैना, राघू, साळुङ्की, चण्डोल्
नकोत मजला विविध सुरांचे कृत्रिम हे हिन्दोल् १

अेक तुझा स्वर आर्त खरोखर वाटे मज बिनमोल्,
वसन्त नाही अजुनि सम्पला, कां झालीस अबोल् ? २

सुखें वसन्तासङ्गे जा मग पहावया भूगोल्,
गा शेवटचा बोल लपूनहि पर्णामाजी खोल्. ३

पाहिन नन्तर वाट वर्षभर दाबुनि चित्त विलोल्,
नको करूं पण आस अेवढी जातां जातां फोल् ! ४

ता. २४ ऑगस्ट १९२६ ]

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ३१०८४
ता.
ठाणे.

## ४९ वृद्ध कवि

[ जाति मुद्रिका ]

कां अुठतां ? खाली बसा तरुण मण्डळी,
अुपचार ठेवितां कां हा ?
समताच योग्य या स्थळीं. १

लोचनांत आदर दिसे न हा थोडका,
स्तुतिहून नसे स्नेहाची
ही शान्त नजर गोड का ? २

म्हणण्याचा आग्रह नको, अहो वृद्ध मी;
नव कवनें अैकायाची
परि हौस न झाली कमी. ३

झोपली थकुनि अन्तरीं स्फूर्तिनन्दिनी,
जाहला पराक्रम मागे
जरि थोर आमुच्या दिनीं. ४

बदलली सृष्टि, सम्पले दिवस आमुचे,
ही समुद्धारिणी क्रान्ती
चालली प्रभूला रुचे. ५

मी झालों पिकलें पान आणखी तुम्ही
टवटवीत सुमनें नामी
काव्याच्या कल्पद्रुमीं. ६

वा क्षितिजीं तारे तुम्ही नवोदित पहा,
चालला लयाला माझा
क्षीणांशु काव्यदीप हा. ७

## ५० कलारहस्य

[ जाति मुद्रिका ]

“कल्पना तरल किति ! ललित नादमाधुरी,
भूमिका अुदात्त अहा ही
अप्रतिम कलाचातुरी ! १

कवि कोण ? गूढ तच्चरित कळूं द्या जरा,
अन् कोण अहो व्यक्ती जी
वाहवी स्फूर्तिचा झरा ! ” २

कवि कुणी असो, तो मला वाटतो सखा,
फाडुनी हृदय बघण्याचा
पाहिजे क्रूर सोस कां ! ३

पडसाद गोड कविगीत अुमटवी हृदीं,
जवळीक अुपजवी न्यारी
जशि कुमुदमनीं कौमुदी. ४

अुद्दिष्ट असो ती कुणि पार्थिव अङ्गना,
रञ्जवी अधिक तिजहूनी
मम हृदयीं ही व्यञ्जना. ५

आदर्शभूत ती तया, मला कासया ?
हृत्तरलतरङ्गीं माझ्या
ही शोभे पद्मालया. ६

रेखीव अमुक ती असो कुणी कामिनी,
ही शाश्वत मम हृदयींची
मोहिनी कलारूपिणी ७

हृत्पटावरिल भरकामचित्र टाकुनी
बघण्याला मागिल टाके
ठाकेल रसिक का कुणी ? ८

ता. १० सप्टेंबर १९२६ ]

## ५१ वादळाची रात.

[ ओवी ]

१ होती वादळाची रात
अवसेच्या अन्धारांत
वाट कोणाची पहात
बाला अुभी ?

हासें विद्युल्लता वर,
खाली बेगम सुन्दर,
दिसे तिच्या मुखावर
काय भाव ?

३ यायचा का प्रेमी वीर
कोणी तरुण अमीर ?
दिसे भेटाया अधीर
कोणाला ही ?

४ परी लागतां चाहूल
फिकें पडावें कां फूल ?
हेरी कोणाचें पाअूल
कानोश्याने ?

५ वीर येतां तो जवळी
दोघें मिळालीं कवळीं
अबला ही आणि बळी
झुन्जार तो.

६ ओसरतां प्रेमपूर
होतीं दोघें पुन्हा दूर
माजे कोणतें काहूर
त्याच्या चित्तीं ?

७ चर्या जाहली भेसूर,
जरी भरूनि ये अूर,
निघे निश्चयी निष्ठुर
स्वर त्याचा.

८ " खाल्लीं आअीबापें खन्त,
झाला अपमानें अन्त,
अन् तू शृङ्गारीं जिवन्त
ताअी केवी ?

९ तूज पळवूनि आणी
–कुळाची ती मानहानि!–
अन् त्या चोराची तू राणी,
सौभाग्य हें!

१० ज्याने धर्म अुच्छेदावा,
ज्याचा घराण्याशी दावा,
त्याच्या प्रेमाचा पुरावा
तू करावा!

११ नको सप्तसहस्त्री ती!
माझी मन्सबीं का प्रीती!
नच स्वीकारी खली ती
दासदीक्षा.

१२ कुळ प्रेमाहून थोर
देश कुळाहून थोर
धर्म देशाहून थोर
केव्हांही गे!

१३ आअीबापें गेलीं जेथ
वैरी धाडिला मी तेथ
आता तू मी समवेत
जाअूं वर.

१४ घोर कर्माची ती वेळ
खत्री हत्यारी हटेल
रणी काटील कटेल
जोहरी तो.

१५ ती घे आवळूनि दात
जातां कट्यार अुरांत!
त्याचा न चुकेच हात
निजवक्षीं.

१६ प्रेतें अेक झालीं तळी,
होती जगती निजली,
वरी ओरडे बिजली
मेघ रडे!

ता० १२ सप्टेंबर १९२६]

# ५२ पोचवणूक

[ अभङ्ग ]

१ घरीं बैसतां का वाया!
चला बाहेर हिण्डाया
खुल्या माळाला बाहेर
वारें चैतन्यमाहेर
सेवूं पश्चिमझुळूक
गाअूं अुजेडीं अन्धुक
चला करूं या बेडर
वाद प्रिय कलेवर—

वतनाचे बन्दे खन्दे आपसांत लढले,
स्वामिभक्तीमध्ये राष्ट्र बुडवूनी चढले,
कुळ-वाडीपायी पहा कलमाही पढले,
परकीयदास्यपङ्कीं स्वस्थ झाले विशेष. २

भान्जलेल्या धर्ममूर्ती रानोमाळ पडती,
गान्जलेल्या हिन्दु देवी जनान्यांत कढती,
खेडवळ मुके जीव दारिद्र्यांत कुढती,
चाले परी अमीरांचा ऐशाराम हमेश ! ३

पण्ढरीचा सन्त तोही भक्तिभाव गौरवी,
आध्यात्मिक मुक्तींतच मानी सुखथोरवी,
राष्ट्रमुक्तीचाच परी अुदयाला ये रवी
योगी कर्म-कुशलाला कशाचें हो अपेश ! ४

मावळींचे प्रामाणिक मावळे हे बावळे,
त्यांच्या पुढे शिद्दी-तुरुकांची छबी मावळे,
नेता यांचा श्रीशिवाजी तेज याचें आगळें,
हर हर महादेव ! चिरञ्जीव स्वदेश ! ५

म्लेञ्छापुढे मराठ्यांनो, कां व्हा दीन, कां वाका ?
फडफडे भोसल्यांच्या प्रतापाची पताका !
अल्पसन्तुष्टता का रे ! ठेवा थोर आवाका !
पसरूं द्या हिन्दुस्थानभर नवा आवेश ! ६

ता. ९ आक्टोबर १९२६ ]

# ५६ अभिसारिका

नवतिच्या बहरामधि बालिका
करूनी साज तऱ्हेचा निका
चालली लगबगा कोठे अभिसारिका ! १

कोणता राजहंस मानसीं
हुरहुरे ज्यास बघाया अशी !
किती डौलदार चापल्य हें तिच्या नसीं ! २

चोळी अङ्गामधि जरतारी,
पातळ निळें खडीचें भारी,
सन्ध्येची लाली तनुमन रङ्गविणारी. ३

पुढे तिज ओढी रम्यायती,
वायुच्या लहरीपरि जाय ती,
थबकती बघुनि तिज हरिणें, गति काय ती ! ४

भागुनी विकल होय तनुलता,
स्त्रीची कुसुमासम मृदुलता,
लागतां दृष्टि कोमेजे फुलतां फुलतां. ५

तोंच ये वंशततींतुनि शील,
उल्लसित हो युवती श्रमशील,
मनिं म्हणे, ‘ श्यामला, जवळच तू असशील.’ ६

जिवाला अतर्क्य ती लागणी,
मनाची तनुपुढे धावणी,
भेटला काय तिज कुठे जिवाचा धनी ! ७

## ५६ अभिसारिका

मिलनोत्सुक स्त्री.

नवतिच्या बहरामधि बालिका
करूनी साज तऱ्हेचा निका
चालली लगबगा कोठे अभिसारिका ! १

कोणता राजहंस मानसीं
हुरहुरे ज्यास बघाया अशी !
किती डौलदार चापल्य हें तिच्या नसीं ! २

चोळी अङ्गामधि जरतारी,
पातळ निळें खडीचें भारी,
सन्ध्येची लाली तनुमन रङ्गविणारी. ३

पुढे तिज ओढी रम्यायती,
वायुच्या लहरीपरि जाय ती,
थबकती बघुनि तिज हरिणें, गति काय ती ! ४

भागुनी विकल होय तनुलता,
स्त्रीची कुसुमासम मृदुलता,
लागतां दृष्टि कोमेजे फुलतां फुलतां. ५

तोंच ये वंशततींतुनि शील,
उल्लसित हो युवती श्रमशील,
मनिं म्हणे, ‘ श्यामला, जवळच तू असशील.’ ६

जिवाला अतर्क्य ती लागणी,
मनाची तनुपुढे धावणी,
भेटला काय तिज कुठे जिवाचा धनी ! ७

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्वत्व प्रत
सं. ग्रान्य नं. ११०
ता. ........
ठाणें.

## ५८ भुकेलें हृदय

[ अभङ्ग ]

१ हृदय अेकाकी
कळवळे भारी
कोकिळ शेजारीं
म्हणे, कूअू !

२ विचित्र स्वप्नांची
सम्पली रजनी
शान्तिलाभ मनीं
परी नाही.

३ पडे गच्चीवर
गार दहिवर
आणि गहिंवर
आंत दाटे.

४ जीव गोन्धळून
होतसे अुदास
म्लानता नभास
सकाळीं का !

५ मित्र तो अुषेचा
धुक्यांत गवसे,
आशामुखीं हसें
म्लान म्लान.

६ खालती धावती
कामाची माणसें
विश्रान्तीच नसे
पोटाला या.

७ भुकेलें हृदय
धडधडे भारीं
कोकिळ शेजारीं
म्हणे, कूअू !

ता. २७ अेप्रील १९२७ ]

## ५९ बुल्बुलास

बुल्बुला, रडशि कां बसुनि दुरी ?
ही अशी प्रतीक्षा फोल पुरी ! ध्रु०
गुलाबकलिका ही बघ फुलली,
गन्धाविभ्रमीं वाही जवळी—
अूठ, घाल झड, हृदयीं कवळी ! कण्टकभय का सले अुरीं ? १

सहुनि अुपेक्षा, कहर अवास्तव
असेल झुरला प्रेमवचास्तव,
वायसङ्घ गाजवी अता स्तव, औषध मेल्यावर नलगे. ५
अनामका, तव सरली धडपड
नीज तळीं, जरि वर ही गडबड--
जगच्छान्तिची पोकळ बडबड ! खणखणती कोषीं खड्गें ! ६
ता. २७ मे १९२७ ]

## ६१ अन्धारून आलें

[ अभङ्ग ]

१ अन्धारून आलें,
चिम्ब झालें जग,
स्तब्ध झाले खग
झाडांवरी.

२ पागोळ्या वाजती,
वरकड शान्त,
धुन्दता दिशांत
कोन्दाटली.

३ डोङ्गराची बाह्य-
रेषा लुप्त झाली,
त्यास कुरवाळी
मेघमाला.

४ म्लान या प्रकाशीं
अेकला घरांत
बसें मी पहात
वर्षा-लीला.

५ पाण्याची चादर
जमे क्रीडाङ्गणीं,
पावसाचे मणी
क्रीडतात.

६ काय बरें चुके
माझ्या अन्तर्यामीं ?
पुढील दर्या मी
केवी तरूं ?

७ चोहिकडे पाणी
अथाङ्ग अफाट,
नाही जरी लाट
भिववाया.

मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. क्र. ५१४६
मराठी ग्रंथ संग्रहालय स्थळ प्रत
सं. ........ नं. ....
ता. ........
ठाणे.

सखये, विधु आणि कैरवी
न कधी दूर, परन्तु आपण
जर सन्निध मुग्ध शैशवीं
तर आताच वियुक्त का पण !

ता. १९ जून १९२७]

## ६३ केवढा अन्याय !

[ छन्द ]

१ प्रेम तुला कळविलें
माझा केवढा अन्याय !
तुझे अन्तरले पाय.

२ स्तुति काव्यदेवतेची
गातां ललित रागांत
झाला भलताच घात.

३ तुझ्या लावण्याला जणू
कवनाचा लागे डाग,
म्हणून का आला राग ?

४ तुला भावड्या भक्तीचा
बोल अवघड वाटे–
स्त्रीचें मन अुफराटें !

५ भय प्रेमाचें वाटतें ?
वर कशास तू आन,
होवो तुला समाधान.

६ नाही समाधान मला,
नको नको असें यश
न करी जें तुला वश !

७ मिश्र धातूचें शिक्क्याचें
नाणें खणाखण वाजें,
होतीं त्यानें जगीं काजें.

८ नाही चलन तें माझ्या
दरिद्र्याच्या भाण्डारांत,
दीस म्हणून हो रात.

९ आलों अुपेक्षाव्यथित
हळू हळू दूर दूर–
शमेनाच हुरहूर.

१० कळवळून दुरून
घालतां मी तुला साद,
अरण्य दे पडसाद.

वारुळाला जाअूं सङ्गें
गाणीं गात गात रङ्गें
झेली पृथ्वी नागराज
त्याची पूजा चाले आज.

४ अुठा अुठा साऱ्या जणी
नागपञ्चमीच्या सणीं
फान्दियांना बान्धा दोर
झोका मोठा घ्या समोर
अुत्सवाच्या झोल्यावर
घेअूं झोके दिनभर
तृणाङ्गणीं फुगड्यांत
पाहूं कोण टिकतात
सायङ्काळीं स्वस्थ बसूं
खेळीमेळीनें या हसूं
कोणी चतुर शहाणी
मग साङ्गेल कहाणी

५ नागपञ्चमीच्या सणीं
अुठा अुठा साऱ्या जणी
पञ्चमीची रुन्द कोर
दिसे, न दिसे समोर
कोणी म्हणे आकाशांत
तारा फेर धरितात.
चञ्चल या चान्दण्यांत
फेर धरूं गाणें गात
कोणी अेक साङ्गा आधी
नाचूं म्हणूं आम्ही नादीं
हेलावत लहरींत
नागपञ्चमीचें गीत

ता. २ ऑगस्ट १९२७ ]

## ६५ तुझ्यावाचून

[ वृत्त वसन्ततिलका ]

येथे कला विकसुनी जरि मोद देअी
मोदामधे परि अुणीवच गे असे ही—
व्हायास रम्यतर रम्य कलाविलास
कोठें मनोज्ञ सहवास तुझा जिवास ?

ता. ३ ऑगस्ट १९२७ ]

वारुळाला जाऊं सङ्गें
गाणीं गात गात रङ्गें
झेली पृथ्वी नागराज
त्याची पूजा चाले आज.

४ उठा उठा साऱ्या जणी
नागपञ्चमीच्या सणीं
फान्दियांना बान्धा दोर
झोका मोठा घ्या समोर
उत्सवाच्या झोल्यावर
घेऊं झोके दिनभर
तृणाङ्गणीं फुगड्यांत
पाहूं कोण टिकतात
सायङ्काळीं स्वस्थ बसूं
खेळीमेळीनें या हसूं

कोणी चतुर शहाणी
मग साङ्गेल कहाणी

५ नागपञ्चमीच्या सणीं
उठा उठा साऱ्या जणी
पञ्चमीची रुन्द कोर
दिसे, न दिसे समोर
कोणी म्हणे आकाशांत
तारा फेर धरितात.
चञ्चल या चान्दण्यांत
फेर धरूं गाणें गात
कोणी अेक साङ्गा आधी
नाचूं म्हणूं आम्ही नादीं
हेलावत लहरींत
नागपञ्चमीचें गीत

ता. २ ऑगस्ट १९२७ ]

## ६५ तुझ्यावाचून

[ वृत्त वसन्ततिलका ]

येथे कला विकसुनी जरि मोद देअी
मोदामधे परि अुणीवच गे असे ही–
व्हायास रम्यतर रम्य कलाविलास
कोठें मनोज्ञ सहवास तुझा जिवास ?

ता. २ ऑगस्ट १९२७ ]

आणि खपतां मी अितर जनांसाठी
कधि न निढळीं तव आढळली आठी,
स्वार्थसाधू वरवरच मानितात,
स्निग्ध निस्स्पृहता नित तुझ्या स्मितांत. ६

यत्न केला नच हृदय पारखाया,
सहज तरुपरि मज दिली फलच्छाया,
आणि विहगापरि ठेविलें स्वतन्त्र
गाअिले मी स्फूर्तिने कला-मन्त्र. ७

भूस भेटे मृगमेघबिन्दु जेवी
तसा आलों मी तुझ्याकडे देवी,
घेअि गाढालिङ्गनीं त्यास भूमी,
तसें पावूं या अैक्य आज तू मी. ८

कीर्ति लाभे मज, हवी परि कशाला
गुलाबाची वा बकुळिचीहि माला ?
हृदय अपुलें हृदयास भिडे अन्तीं,
नको, असली तरि मधे वैजयन्ती ! ९

म्हणुनि कीर्तिस्रज धर शिरीं तुझ्याच,
तुझ्या प्रीतीसच शोभवील साच;
मला अद्वैतीं गमे बुडुनि जावें—
पुढे जाणें कुणि कुठे कुणा ठावें !

ता. ५ ऑगस्ट १९२७ ]

# ६८ संवाद

[ अभङ्ग ]

१ जुनें झालें झालें फोल—
काय बोलशी तू बोल ?
रूप सुन्दर बरवें
तूज हवें नित्य नवें.
नव्या सोङ्गाचिया फक्त
पायीं लागणार भक्त
रूपें अनन्त सुन्दर—
बघशील नीट तर.
माझ्या ठायीं तिन्ही काळीं
नान्दे लावण्यनव्हाळी.
वर फेक दृष्टि क्षण
आकाश हें सनातन
भव्य सुन्दर नवता
देख विभूति तत्त्वतां
अैसे सगुण निर्गुण
तू न पाहशी ढुङ्कून
ठेव श्रद्धा तू भाबडी
आहेच मी सवगडी.

२ तुझा चातुरीचा बोल
भगवन्ता, पडे फोल
गप्प करिशी सम्प्रती
आहेच मी मन्दमती
अन्तरींची भूक माझी
गप्प राहीना देवाजी.
दोष मला कां रे आता
तूच जरी बुद्धिदाता ?
चित्र रङ्गतां आभाळीं
रङ्गतों मी सन्ध्याकाळीं
चित्रामागील नीलिमा
शान्त गाम्भीर्याची सीमा—
तेथ वेड्या या जीवाला
काही दिसेना जिव्हाळा.
पटे ओळख देखून
अैशी काही दाव खूण.
तूच माझा सवगडी,
गड्या, का रे देशी दडी ?

ता. १९ ऑगस्ट १९२७ ]

३ ठेवा अेकटी घरीं
धीट आनन्दी परी
थो थो काजळ वाला
नाही पाणी डोळ्याला
निजे पुढ्यांत माझ्या

कधी वाजेना बाजा
पौर गुणाची खाणी
व्हावी कुणाची राणी !
हिला आणाना राजा—
नाना, हासतां का ? जा !

ता. २९ ऑगस्ट १९२७]

## ७१ अङ्गाअी

[ छन्द ]

१ कुणा नाही बघवलें
बाळ लुटुलुटू चालें
पडलें ग—काय झालें ?

२ कुठे लागलें नाही ना
चिमुकल्यास या माझ्या ?
अुगी अुगी माझ्या राजा.

३ पहा अुन्दिर पळाला,
देअूं त्याला असा मार
झाला खोडकर फार.

४ अुगी ! कोण पाडसाला
माझ्या बोललें रागाने ?
शहाणें गे माझें तान्हें !

५ अुद्या दुपारीं बान्धूं हं
त्याचें अुन्हामध्ये घर,
बाळ माझें खेळकर !

६ केलें अङ्गुलें मङ्गुलें
तीट लाविली बाळास.
दृष्ट गेली, गडे हास.

७ चल बाहेर कसा तू,
बघ चान्दण्या हासती,
बाळ, तुला खुणाविती.

८ बाळ, खेळून खेळून
आता येशी झोपायला,
वर चान्दोबा भागला.

९ चान्द निम्बोणीच्या झाडा-
मागे निजायला गेला
पाङ्घरून काळा शेला.

१० बाळ माझ्या ग पदरा—
खाली निजे माण्डीवर
रत्न माझें मनोहर !

९ आमुचें घर छान,
म्हणती आम्हा द्वाड
करिती परी लाड
बाबा आअी

१० अङ्गणीं सारवल्या
खडूने काढूं शिडी
लङ्गडी चढोवढी
खेळायला.

११ घरांत जिन्याखाली
ताअीचें घरकूल
खड्यांची थण्ड चूल
पक्वान्नें दे

१२ भाण्डून केव्हा केव्हा
म्हणतों, जा ! फू गडी !
लागेना परी घडी
अेक व्हाया

१३ आमुचें घर सान
आतां तें कोठें गेलें ?
बाल्याचें हें भुकेलें
मन पुसे

ता. १४ सप्टेम्बर १९२७]

## ७३ आगगाडी

[ छन्द ]

धडाड धडाड
खडाड खडाड
धावते ही गाडी
केवढी धडाडी !
खाअून रगड
काजळी दगड
पाण्याचे रान्जण
घोटांत पिअून

फुस्फुसे नागीण
वाऱ्याची बहीण
तोण्डाने जळते
सर्वाङ्ग वळतें
पाठीचे मणके
पोकळ टणके
टाकिते तोडून
घेतेहि जोडून

## ७४ मेलों तरी मेलों

[ अभङ्ग ]

१ मेलों तरी मेलों
मरण न चुके
मन माझें भुके
ध्येयासाठी.

२ ध्येयाच्या कारणीं
श्रम आणि काळ
जाऊनिया फळ
नाही, बरें !

३ परी थेम्ब थेम्ब
माझिया रक्ताचा
शूर वीर साचा
होईल ना ?

लढूनि मरतां
मरें सैन्य सारें,
परी उरें वारें
वीरश्रीचें.

५ जीविताचें माझ्या
निघेल तें सार
होवो अनिवार
माझ्यामागे.

६ तेंहि न निघालें
तरी चिन्ता नाही
ध्येया, तुझ्यापायीं
देह पडो.

७ पावोत सामान्य
आशा माझ्या भङ्ग
दृढ अन्तरङ्ग
तुझ्या ठायीं.

आक्टोबर १९२७]

## ७६ अुठा रे !

[ छन्द ]

अुठा रे ! चुलीशी का अशी दाटी !
न्हाणींत जा निघा आङ्घोळीसाठी
घाअी गे कशाची आदित्यवारीं ?
थण्डीचा कडाका पडला भारी

हें पण सर्पण वाया जळतें
अङ्घोळीने थण्डी चट पळते
खाअून फुगीर आरोळी पोपी
अङ्गांत चढवा डगला टोपी

म्हणतें कुठे मी, घ्या बूक पाटी ?
जा खेळा, न करा चुलीशी दाटी.
कोवळें धुकट सोनेरी अून
बोलावी तुम्हाला करून खूण

पोपटी गवतीं पडून दंव
पाण्डुर पाण्डुर ये रङ्ग नव
वाहूं द्या पूर्वेचा चावरा वारा
खेळाच्या अुवेचा तडाका न्यारा

धुक्याची धाबळी वेढून दूर
डोङ्गर आजोबा ध्यानांत चूर
खेळूं द्या मोकळा मुलांचा ताफा
नाकाने तोण्डाने निघूं द्या वाफा !

ता. २८ नोवेम्बर १९२७ ]

सं. ग्रंथ. नं. ११७ ता. ठाणें.

जसा कवडसा पडे छपरांतून
अलगत येअी तसा बाळ वरून;
बाजेवर आअी त्याला झेलून घेअी,
माखूं न्हाअूं घाली मग प्यायाला देअी. "

" नाही बाळ ! गुलाबाला आपुल्या फूल
येअी तसें रात्रीं घरीं सोनुलें मूल.
परसांतल्या पेरूला ये जसें फळ
तसें भेटे आअीलाहि सानुलें बाळ.

भूक जशी लागूनहि नच दिसते
हृदयांत बाळ तसें माझें असतें.
आअीसारखें तें होअी म्हणूनी बाळ –
मग देव साऱ्यांचाच करी साम्भाळ. "

" चिडविते ताअीटली कां मग मला ?
म्हणे, चतकोरावारी तुला घेतला. "
" नको अैकूं ताअीचें तू जा आता खेळ.
या बाळाची झोपायची झाली रे वेळ. "

नोवेम्बर १९२७

## ८० काअू काअू गे !

[ छन्द ]

१ काअू काअू गे
ये हा खाअू घे
काअूचा घास
नको बाळास

२ चिअू मावशी
अुडते कशी
अुचली शीत
फारच धीट

३ माअू लबाड
घालील धाड
माअू गोरटी
दूध चोरटी

४ काअू चिअू खा
या भिअूं नका
दूधभात हा
अुरला पहा.

बाळ जेवलें
गाढ झोपलें.

डिसेम्बर १९२७]

## ८१ स्वप्नांची माला !

[ जाति चन्द्रकान्त ]

जीवित म्हणजे असे बापुडी स्वप्नांची माला—
स्वप्नहीन परि हाय न येअी झोपच जीवाला.
निमिषाचा लक्षांश टिको हें स्वप्न परि न खोटें,
त्यांतच हासे अन् वस्णावे जीव, नवल मोठें.

ब्रह्मयाच्या त्या अेकच निमिषीं कितीक मनु होती,
जशा कदाचित् क्षणीं कुणाच्या ब्रह्मयाच्या कोटी !
आणि चिमुकलीं फुलें भूतलीं नक्षत्रापरि तीं
नसेतना दीर्घायु !! परन्तु स्मित गन्धित करिती.

काम्बळीवरती म्हातारे
विसावा घेअुं देत सारे
आपण परी बालभीम
खळाखळ खेळूं लेजीम

वाजतो धुडुम् धुडुम् ढोल
गड्यांनो अुठा धरा गोल
फुरफुरे ढणाढणा पोत
दाखवी वाऱ्याचा झोत

चान्दण्या पहातात मौज
कष्ट ते आहेतच रोज
पाहते पाण्ढर पोशाखी
खेळते काळी, धौशा की !

धरा रे फेर कठिण बाका
पाअुलें तालावर टाका
खळाखळ लेजिम वाजूं द्या
अुभें हें शिवार गाजूं द्या

सरका अुठा बसा खाली
मागे पुढे भोवताली
खळालुनि लेजिम फेरांत
दुमदुमे आनन्दें रात

स्फूर्तिचे अैका रे बोल
वाजे धुडुम् धुडुम् ढोल
चालुं द्या अेक धुमश्चक्री
चढूं द्या घोषें वीरश्री

४ भव्य हें गगन
क्षुद्र खालीं तृण
दोहींत करुण-
रस तुझा

५ अणुरेणूंमाजी
तुझीच विभूती
याची अनुभूती
मला देई.

६ वियोगाची भीती
वैराग्याची नीती
काही नसो चित्तीं
प्रीतीवीण.

७ वाटे तुझ्यावीण
मज नाही बळ
अन्तरीं विव्हळ
सदैव मी

ता. २७ जुलै १९२८ ]

ग्रंथ संग्रहालय
एकक प्रत
क्र. ... दे. ...
ता. ...
ठाणे.

## ८४ माझा व्याकुळतां जीव

[ अभङ्ग ]

माझा व्याकुळतां जीव
घेतों तुझ्याकडे धाव
धाव लागतां हृदयीं
येई ओठीं 'आई! आई!'
एकाकी मी हाय हाय !
वाटे जगीं असहाय.
सरे जग दूर दूर
भरे तुझ्या प्रेमें ऊर
मागूं तुझ्यापाशी काय
न कळे हें देवराय !
श्रेय माझें कशामाजी
तूच जाणशी देवाजी
राहो निकोप शरीर
राहो मनीं शान्ति धीर
घडो तुझ्यासाठी देवा
तुझ्या प्रपञ्चाची सेवा
पटो सदैव जीवास
असशी तू आसपास.

ता. २६ ऑगस्ट १९२८ ]

तृण भिजुनी मधु सुटतो परिमळ,
पान्दीनें जळ येअी निर्मळ,
दिसे तरङ्गित वाळूचा तळ,
जळाकडे खळखळे पळे जळ द्याया जीवनदान् . ६

दूर पलिकडे त्या माळावर
नीलपटाच्या पुढे समान्तर
झाडांची ती राङ्ग पहा तर –
सडक जाय ती जोडित गावें करुनि जिवाचें रान् . ७

फूलपाखरें पण पायाशी
मजा मारिती तृणांत खाशी,
अुडति यथाबळ हीं अवकाशीं–
नको अुद्या वा काल, आजचें अूनच यांस निधान् . ८

शान्त सुखद हें सृष्टितपोवन !
निरपेक्षपणें अिथे रमो मन,
अुपाधि करितिल चित्तीं क्षोभ न,
हवें कशाला स्वर्गी चञ्चल जाया कल्पविमान् ? ९

दूर गडाचा शोभे डोङ्गर,
छातीवर जरि मेघाडम्बर,
धरी सावरुनि शीर्षी अम्बर,
तो तर पावन नील मर्गजी गमे स्वर्गसोपान् १०

. . .

दृश्यें अन्धुकतीं या समयीं
विरे विविधता हळुहळु विलयीं,
दिसे पसरली अफाट कढअी,
दुसरी तीवर अुपडी, मध्ये जीवन गूढ महान् . ११

ता. १ सप्टेम्बर १९२८ ]

## ८७ सर्वस्वाचा यज्ञयाग

अन्तरीं सारखी आग आग !
दे दैव त्यांतुनी वरुनि डाग. ध्रु०

जीवनाविना मत्स्य तडफडे,
काठावर बन्धनीं धडपडे,
ध्येय जवळ तो बघे चरफडे—स्फटिकशान्त हिमजलतडाग ! १

स्वैरालापी, प्रेमपरायण
पुष्पविलासी, कविताचारण
पडे तोच खग फशीं पहा पण दृष्टिपुढें जों अिन्द्रबाग ! २

प्रीतिशोधनीं थकुनी भागुनि
होतां संन्यासी वैतागुनि
येअि सुभद्रा भेटीलागुनि निषिद्ध ते जंव रङ्ग-राग. ३

ज्याच्यासाठी झुरतें अन्तर
येअि निराशोत्तर तें मन्थर,
विलम्ब निमिषाचाच निरन्तर ! अवेळींच ये त्यास जाग. ४

मृत जीवित हें, जिवन्त ही मृति !
टिकेल कुठवर मनुजाची धृति ?
अतर्क्य दैवा, काय तुझी कृति ! सर्वस्वाचा यज्ञयाग ! ५

ता. २२ सप्टेम्बर १९२८ ]

## ८९ नावेंतील गाणें

[ जाति मोहनी ]

काय गाउं ? कोठुनि आणूं तुझी रागदारी ?
तूच गा धरूनि सुकाणूं गीत कष्टहारी. ध्रु०

ललित तरल गीतें गाअी जिथे राग-राणी
तिथे काय विद्याजड मी बोलुं गे अडाणी !
रहा गात वागीश्वरि, तू सान्ध्य-भाव-गाणीं–
सान्जदीप अुजळे गगनीं, मार वर भरारी ! १

स्वर्ण सलिल चुम्बित रङ्गे दूर ती प्रतीची,
लीन शान्त होअुनि जाती पहा सलिल-वीची,
लीन शान्त त्यांतच झाडी दाट दों तटींची,
तुझ्या मात्र वसनीं, गानीं लहर चमक मारी. २

सहज गान जीवन तूझें शान्त या दिनान्तीं
यदा वरुण फेकी वरुनी अरुणरागकान्ती,
कष्ट हेंच जीवन माझें, असो नसो शान्ती,–
घरीं ताल तुज वल्हवित मी, भाग्य हेंच भारी ! ३

ता. ७ नोवेम्बर १९२८ ] रविकिरण मंडळाचे वैशिष्ट्य
यशवंतांनीही 'नौका विहार' हि
असेच गा प्रयोग किती आम

## ९१ वृद्ध भटजी

[ जाति मुद्रिका ]

कां अुठतां ? बैसा अहो रसिक मण्डळी !
नच कामाची ही घाअी,
होअुं द्या स्वस्थ या स्थळीं. १

सङ्कोच भोजनीं गोड परी थोडका;
थकलात तुम्ही पण आम्ही
अुठवूंच नये झोड का ? २

छे ! आग्रह मजला नको. अहो, वृद्ध मी;
पक्वान्नें पचवायाची
परि शक्ति न झाली कमी. ३

जीवन्त अजुनि पोटाग रसग्राहिणी,
किति करी पराक्रम मागे
ही रावबाजिच्या दिनीं ! ४

बदलली सृष्टि, सम्पले दिवस आमुचे;
ती षड्रसभक्ती गेली,
विरस हा कुणाला रुचे ? ५

मी चिवटच पिकलें पान चिकटतों द्रुमीं,
अन् सोडुनि भरलीं पानें
अुठतसां, तरुण ना तुम्ही ! ६

मावळते तारे तुम्ही सकाळीं पहा,
अुजळतों परी गाभारा
मी घृतनन्दादीप हा ! ७

## ९२ सर्वा खल्वियं माया !

नादावुनि केलें मी भ्रमण किति अहो तें !
विश्रान्तिस्थल अन्तीं हेंच हाय होतें. ध्रु०

हमरस्त्याहूनि दूर चिमुकलाच गाव,
डाकघराचाहि जिथे नेणवे अभाव,
कष्टकरी दीनांचा मूठभर जमाव,—
जीवन अज्ञात तिथे वाटें मज कोतें. १

ते तिकडे पीत माळ पसरती अफाट,
हा अिकडे रम्य गार हरित नदीकाठ,
लवणांतुनि अूसगहूशाळुचाहि थाट !
स्वगृहांत परि गवसे सौन्दर्य न कोठे. २

हृद्वीणा अननुभूत सहजकम्प पावे,
सहकम्पें अतिकाङ्क्षा स्फुरित हो स्वभावें,
गमे रूढि भङ्गुनि मी ध्येय नवें गावें
की सीमोल्लङ्घनींच पौरुष तें मोठें ! ३

होतां वश वाग्देवी निघे प्रेमबोल,
हृदय हेंच मोल जया, न हो हेम मोल,
भावसिन्धुवर होती रसिक किति विलोल,
रिक्त-हस्त मी, जनता वेची मणिमोत्यें. ४

तो मीनाबाजार न, हसे रङ्ग-रात,
ज्योतींवर किति पतङ्ग झेप टाकितात !
मीहि मग्न मुक्तमधुपभावगुञ्जनांत–
मोहनलहरींत आणि जीव खाय गोते ! ५

हो असाच आजवरी कितिदा मज भास,
अन् बघतां कवटाळुनि जाहलों निराश !
अदय भूत कां तें मम करी दुर्विलास ?
काय वञ्चनींच वसे प्रीतिची खुमारी ? २

तू का क्षीराब्धिसुता ? येशि कुणिकडून ?
पथ चुकलिस का धुक्यांत तूहि सापडून ?
अन्तर्हित हो जा वा भेट कडकडून !
पुरे पुरे चेष्टा ही जरी चारु सारी ! ४

ता. १५ फेब्रुवारी १९२९ ]

मराठी ग्रंथ संग्र
स्थळ प्रत
सं. नं.
ता.
दा.अं.

## ९४ श्रान्त पान्थास

श्रान्त पान्थ, घडिभर तू ठेव ही हुशारी !
अिष्टस्थल हाकेवर—चल जरा पुढारीं ! ध्रु०

तूच अूठ, योग्य न मी देणें तुज हात;
द्युति होअिन तव नयनीं, स्फूर्ति अन्तरांत;
रम्यायति होअुनि मी तुज असें वहात;
चल सखया, निकट अलग सङ्गति मधु भारी. १

तिमिर विरुनि बघ धुकेंहि विरल होत जाअी,
खालीं खोऱ्यांत पहा श्याम दाट राअी,
दिनसम्राट् पूर्वेंने करुनि ये चढाअी,
पर्वत हा ही अशोक हेमरश्मधारीं ! २

तुझ्या दृष्टिने बघतां बघतां
जाअी काट्यांची कण्टकता;
सहानुभव जंव कवळी जगता, परन्धाम ही भवाटवी ! ३
तुझ्यापुढे कां व्हावी अरुचिर
रातकिड्यापरि माझी किरकिर ?
गाशी अुंजळित तू भवमन्दिर, मूक मनें मी तुला श्रवीं. ४

ता. २२ मार्च १९२९ ]

## ९६ पुरुषाची छाती

विनायकाची रसरसलेली कोठे प्रतिभा ती
गावया पुरुषाची छाती ? ध्रु०

प्रतिष्ठाच जी धर्मांची ही स्त्री हिचियासाठी
स्फुरावी पुरुषाची छाती;
धन रक्षाया, धन वेचाया प्रिय तत्त्वासाठी
धजावी पुरुषाची छाती;
त्यास सिंहबळ येअी घेअी जो शिर तळहातीं,
दे पुढे पुरुषाची छाती !
रौरवीं पचत दैन्याच्या
जगतीं तें जीवन खोटें !
वाटून लाज जगण्याची
मरुनीच काज हो मोठें !
तत्त्वास्तव येणें कामीं
हौतात्म्य दिव्य तें कोठे ?
मात करिल बन्दुकीवरीही वेताची काठी,

तों अेक अधीर पुढे हो
तो पायच तोडायाला—
वाडीबाहिर मौजबघ्यांची जमे हळू दाटी—
पाहिजे पुरुषाची छाती ! ३

तों धावे, ये तरुण मराठी अबलांचा वाली,
सतीला पाठीशी घाली.
पट्टा कुठला ? वेत भिणभिणूं वेगाने लागे,
दचकले खल सरले मागे.
दूर दिसे तों अुजेड, गडबड ये काही कानीं,
ठेपली आणि आणिबाणी.
कडकडाडली तों गोळी,
तो वीर तळीं कोसळला;
बोचकें अुचलुनी पुण्ड
अेकेक तर्मी मावळला.
वाचली मराठी कीर्ती,
वाचली सङ्कटीं अबला !
रक्तपात का अरुणोदय तो ? मृति न, चेतना ती !
धन्य ती पुरुषाची छाती ! ४

ता० २३ मार्च १९२९]

हाय जिवट तनु ! हाय जिवट मन ! लीला प्रकृतिची !
सुटे ग्रहण तों पूर्णशशिमुखीं ये पूर्वीचा नूर्. २
विरक्त ऋषिही सत्यवतीचा रसिक राहु जर हो,
काय बुभुक्षित न करिल दिसतां टन्च सरस अङ्गूर् ३
जरी बहात्तर हुरी प्रतीक्षा करिती बेहेस्तीं
गाजी घाली झडप भूवरहि कोठे दिसतां हूर् ! ४
अवला, मोहक, अजाण–छे ! हा जगीं त्रिदोषच की !
त्यांतुनि विधवा अपशकुनी– तिज पळवी शकुनी दूर् ! ५
रामराज्य तें, जनापवादें सती गृहास मुके,
भूशशिलक्ष्माविषयी काढी न कुणि ' मलिनमपि '–सूर्. ६
गोशांतच खितपणें अरींची वाढवीत सङ्ख्या—
लोकसङ्ग्रह क्षेतन्यायी व्यक्तींना न जरूर्. ७
कां नाजुक अन्याय चोरटा वेशीवर टाङ्गा ?
झाका, राखा अब्रु ! होउंद्या चोर थोर मग्रूर् ! ८
बडे शिष्ट कुणि देउंहि बघातिल आश्रय सोयीचा,
अुद्धारक सहधर्मिणीत्व तें द्याया कोठे शूर् ? ९
परि नरजननी, तू अेकाकी अनिकेत न राही,
परित्यक्त पोरका मीहि, धडधडे तुझ्यास्तव अूर् ! १०
प्रकाश शीतल वरसत राहीं, तापुनि शापुं नको;
बुडविशील तर बुडव वाहवुनि कारुण्याचा पूर् ! ११

ता. १२ ऑक्टोम्बर १९२९]

मराठी ग्रंथ संग्रह
स्थळ प्रत
सं. नं.
ता. ........

दीपोत्सव चोहीकडे,
कोण किड्यासाठी रडे !
कां न शिरीं पाय पडे !
कां न केरसुणी झणी दूर तरी लोटी ! ६

ता. ३० मे १९३१]

## १०० बरा सुटला बिचारा !

Peace peace ! disturb him not
After life's fitful fever he sleeps well.

— *Shakespeare*

[ वृत्त वसन्ततिलका ]

कां सभ्य शोक जन हो करितां अकालीं !
प्रत्यक्ष हानि तुमची किति काय झाली !
मेला मयूर, उरलाच परी पिसारा —
गेला कवीश्वर, बरा सुटला बिचारा ! १

मागे पुसे कुणि, " अहो, कविता नटी का ! "
" दुर्वृत्त साहजिक ही ! " करि आन टीका.
सोसावया अजि नकोच दुरुक्ति-मारा —
गेला कवीश्वर, बरा सुटला बिचारा ! २

आशाज्वरें विकल तप्त पडे, झुरे तो,
स्वप्नांत काव्य करुणोत्कट तें स्फुरें तों;
भिन्ती नसूनि जग त्या विहगास कारा —
गेला कवीश्वर, बरा सुटला बिचारा ! ३

# १०१ आत्मप्रतीति

"पशूनामस्मि गर्दभः" खरी गीता.

हें अेकुलतें अेक गूढगुञ्जित आहे. हें सुनीत नसेल, स्वनितक नसेल, निदान स्वनित – ज्यांत दुसरा चरण पुन्हा चौदावा असतो असें भूपतिजातीय चतुर्दशचरणी गीत तरी आहेच आहे. 'अेको देवः सर्वभूतान्तरात्मा' असें तें अनिर्वचनीय तत्त्व जसें पुरुषोत्तमांत तसेंच मानवादि सर्व पशूंत, व सर्व पशूंत अवधूत अशा त्या खरवरांतहि आहे हें पाहून त्याच्याशी क्षणभर तल्लीन होअूं पहाणाऱ्या साधकाची येथे भूमिका आहे, सिद्धाची नाही. विचारसरणी बहुतांशी औपनिषदिक आहे. सार्वत्रिक शहाणपणाच्या सुबत्तेच्या या काळांत हा 'गाढवपणा' योग्य तो रुचिपालट करील. तेव्हा ज्ञानेश्वर-रवीन्द्रनाथाच्या दायादांनी क्षमाच करावी. शेवटी मराठीच्या परीक्षकांस विनन्ति हीच की, या कवितेंतील गूढार्थ प्रयत्नें सापडेल या आशेने ही कविता प्रश्नपत्रिकेंत घालूं नये. हींत अर्थ नाही. अर्थप्राप्तीसाठी ही कविता नाही; परन्तु 'व्यर्थी अधिकचि अर्थ असे' अशी आशा कोणी केल्यास त्यास कळावें कीं 'तो ज्यांस दिसे त्यां म्हणती पिसे!' या साठी, झपूर्झा! जपून जा!

[ जाति भूपति ]

अवधूत खरा, तू खरा तू स्वयंमन्य!
पटविलें पूर्ण तू मज मी तूच अनन्य.
जागूनि जगाच्या निशीं[1] कम्बुवत् शब्द
करितां तू राही निजुनि हें जगत् स्तब्ध.

---

१ "या निशा सर्व भूतानां" अि०

निढळाच्या घामें मिळे सुका चौत हा,
अुपकार गणावा लागे
हा न्याय धन्याचा पहा ! ३

कष्टांची चिन्ता नसे, तपस्याच ही !
पण अेक तपें खितपे तों
दुसराच भोगितो मही. ४

जाणूनि नेणतें परी व्हायला हवें,
भूपरी तप्त रस पोटीं
पचवाच जरि न साहवे. ५

माझेच हात पण त्यांस वळवितां धनी
खपुं कैसा पोटासाठी
मी नरकाच्या साधनीं ! ६

गेलाच आजचा दिवस, अुद्याचा पुढे;
हें निशीं परी न विसावें
कष्टलें हृदय बापुडें. ७

बाहेर चान्दणें पडे दुधासारखें,
परि भरेल का बाळाचें
पोट या दुधाने सखे ! ८

वाटतें नको हें पोट, नको हें जिणें !
ही पापभीरुता जाची
पैक्याच्या छत्राविणें ! ९

ता. ६ फेब्रुवारी १९३३ ]

१४ लोकीं तुझिया नावाचा
होतां मोठा गाजावाजा
शोध निघेलच माझा.

१५ मग अज्ञात हें नाव
फैलावेल जगामधीं,
दूर अैकेल जलधी.

ता. १२ मार्च १९३३ ]

## १०४ अेक कणिका

हें मचूळ पाणी गोड न लागे तुला,
कां रडुनि कोरडा घसा करिशि रे मुला !
घे तहान थोडी भागवूनि, जा पुढे–
तू रडुनि कसें मधुरत्व ये मला नवें !
करितील खारटच मला तुझीं आसवें.

ता. १३ एप्रील १९३३ ]

## १०५ पापशङ्की

[ सुनीत वृत्त शार्दूलविक्रीडित ]

मी सन्ध्यासमयास कष्ट करुनी येतों घरासन्निध
तों येतात मनीं तशा झरझरा शङ्काहि नानाविध;
कानीं धावुनि जीव आतुर बसे घ्याया तुझी चाहुल,
अन् माझें थबकून जों जड पडे दारामधे पाअुल,

तों येअी तव शब्द खोडकर तो खेळांत आअीसवें,
अन् तेथूनच पाडसा, तुज मुदें मी हाक मारीं जवें,

## १०७ चल अुडुनि पाखरा !

चल अुडुनि पाखरा, पहा जरा–
किति रम्य पसरली वसुन्धरा ! ध्रु०

चोच तुझ्या चोचींत घालितां
गाढ अुरीं तुज धरुनि पाळितां
न हो काळ कधि सुखाचा रिता; स्वार्थच पण हा, न हा बरा ! १

कोश फाडुनी कळ्या अुमलती,
खुल्या अङ्गणीं मुलें खिदळतीं,
खुल्या प्रकाशाकडे द्रुतगती पळे खळाळत कसा झरा ! २

अूब अिथे तुज मअू पिसांची,
गोड ओढ जरि या घरिं साची,
पण ही छाया किती दिसांची ? तुझें निळें नभ पक्षधरा ! ३

विहङ्गमा रे, निज पङ्खांनी
अुडुनि विहर या जगदुद्यानीं–
सराग गाअुनि जीवन-गाणीं अमृत हर रे मनोहरा ! ४

ता. ३ ऑगस्ट १९३३ ]

## १०८ चन्दाराणी

[ ओवी ]

१ कोठे ती चन्दाराणी
राजस रूपखाणी,
गातात गोड गाणीं
कवि जिची !

२ श्यामल पटावरी
हिऱ्यांचा सडा पडे,
टपोर त्यांत खडे
गुरु शुक्र.

१५ चुकून कधी काळीं
मित्राशी तोण्डभेट
होतां तो काळ थेट
अशुभ का ?

१६ कणव नका करूं !
नादांत फिरतें मी
विलीन मित्रप्रेमीं
चन्दाराणी.'

[ब्रा. ५ ऑगस्ट १९३३]

## १०९ गोड बाल्य

[ चाल " मशि बोलुं० " ]

सर्वस्व सुखाचें वाटे न कुणाला बाल्य गोड् ! ध्रु०

काहीहि मिळो त्या सङ्गें
खेळांत कुतुकुनी रङ्गे;
मन भङ्गे नच जरि चाले संसारीं मोडतोड्. १

हट्टही करी परि माझा
चिमुकला घरींचा राजा,
सवगडी हवा मी त्याला, नित त्याची अेक खोड्. २

किति ला[illegible]क हाका मारी !
आर्तता [illegible] ती न्यारी,
याचना करी क[illegible]नेत्रीं मी म्हणतां ' सोड सोड् ! ' ३

निरुपायद[illegible] मी होतां
हम्बरडा [illegible]डी मोठा–
मज सहन न हो कळ त्याची, तळहातींचाच फोड् ! ४

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत १५५
क्रमांक ११०७
ता.
ठाणें.

साम्यवादी दृष्टीने

## १११ राजभक्ति

[ जाति पृथ्वीतिलक ]

कां हवा तमाशा असा राजभक्तीचा ! ध्रु०

लाविती तोरणें, चित्रें जन पुरवासी,
मण्डपास अुजळी बिजली होअुनि दासी,
जयघोषें शीण न ये पोकळ वाद्यांसी,
आक्रोष परि बुडे कष्टचूर जगतीचा. १

चालत्या काळचे अनुचर भूपवराचे
कारन्जें अुडवित गन्धोदकधारांचें
प्रतिमेस भार घालोत पुष्पहारांचे,
ही पोट-पुजा ! हा मान कसा व्यक्तीचा ! २

हें पोट गावविल त्याचेंही स्तुतिगीत
राष्ट्रीय दिव्य, हित जो राही न करीत,
हतबुद्ध मत्त जो जन्मदत्त मधु पीत—
कळसूत्री पुतळा वा बागुल सत्तीचा ! ३

जो जातां सिंहासनीं येअिलच कोणी,
घेअील सत्व जो कष्टकऱ्यांस पिळोनी,
देअील अुपाशी नृसिंहपाठीं गोणी,
श्वानांस आणखी लाभ खास-पङ्क्तीचा ! ४

परि ‘ चिरञ्जीव ! ’ कां तुज न म्हणावें राजा !
जनहितार्थ खपशी, न परी गाजावाजा;
कृति तुझी, स्मृति तुझी ठसे अन्तरीं माझ्या,
जनदास तू नृपा, वाट-करी प्रगतीचा ! ५

पोक्त माय ती अता दिसे,
धरी उरीं निज बाळ,
पूर्वीहूनहि सुन्दर ती
मला गमे तत्काळ्. ६

पुन्हा अेकदा मी पाहीं
अन्तर्दिनीं तें तीस्.
दिव्य द्युतिमण्डल भवती,
समीप राहे ओश्. ७

न वासनांचा ताप तदा
लवहि न भीति-विमर्श्,—
दिसला मज तेव्हाच तिचा
तो सौन्दर्योत्कर्ष् !

ता. २२ ऑगस्ट १९३४]

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळप्रत नं.
सं.
ता.
ठाणें.

## ११३ सुप्रभात !

[ जाति दोहा ]

मुम्बअीमधे पहाल तो
आपुल्याच घाअींत्;
क्वचितच शेजाऱ्याचेंही
असे नाव माहीत्. १

दिल्यावीण परिचय करुनी
पुसे कुणी न कुणास्;
शिकलेले बैठकीमधे
बसती मूक अुदास्. २

स्वीकारील न कोण बरें
अशा मुलीचा हात !
स्पर्शिल गाल न अङ्गुलिने
वात्सल्यें वाहात् ! ९

' सुप्रभात ' ! मी जों वदलों
तीहि वदे तो बोल् ;
अन् सुरगाडीवर निसटे
सहज सावरित तोल्. १०

गुदमरत्या हृदयास मिळे
जणू सकाळ-झुळूक्;
तळमळत्या हृदयाची ती
क्षणांत शमवी भूक्. ११

ता. ३१ ऑगस्ट १९३४]

---

# प्रथम चरणांची सूचि


अजुनि किती छळतोस दैवा, अजुनि किती छळतोस्? ९४
अजुनि युवती-गालास लाजवील २९
अजूनहि आशा वेड्या, ठेविशी का पोटीं? १४२
अन्तरीं सारखी आग आग! १२७
अन्धारून आलें, ९९
अल्लाच्या मुलखांत अेकच करा अिस्लाम भूमीवर ८२
अवधूत खरा, तू खरा तू स्वयम्मन्य १४५
आमुचें घर छान ११०
अुठा रे! चुलीशी का अशी दाटी? ११५
अेकत्र गुम्फून जीवित-धागे ७९
अैकव तव मधु बोल कोकिळे, अैकव तव मधु बोल् ८६
कञ्चनी रसरङ्गाची खाणी ७२
कन्या सासऱ्यास जाअी ८१
करीत भिरभिर वाहे वारा अखण्ड त्या माळावरती ११४
कल्पना तरल किति ललित नादमाधुरी! ८९
कशासाठी? कोणासाठी? ७४
कशासाठी, पोटासाठी १०६
कशी मजेची वेळा ११८
कां अुठतां! खाली बसा तरुण मण्डळी, ८७
कां अुठतां! बैसा अहो रसिक मण्डळी, १३१
काअू काअू गे ११९
कां नको मधुक्रम आज? ३२
का पापभीरुता हेंच पाप १२८
काय गाअुं! कोठुनि आणूं तुझी रागदारी? १२९
काय लाजरी पोर! खरोखर खुळी लाजरी पोर! ५७

# प्रथम चरणांची सूचि


अजुनि किती छळतोस दैवा, अजुनि किती छळतोस्? ९४
अजुनि युवती–गालास लाजवील २९
अजूनहि आशा वेडया, ठेविशी का पोटीं? १४२
अन्तरीं सारखी आग आग! १२७
अन्धारून आलें, ९९
अल्लाच्या मुलखांत अेकच करा अिस्लाम भूमीवर ८२
अवधूत खरा, तू खरा तू स्वयम्मन्य १४५
आमुचें घर छान ११०
अुठा रे! चुलीशी का अशी दाटी? ११५
अेकत्र गुम्फून जीवित-धागे ७९
अैकव तव मधु बोल कोकिळे, अैकव तव मधु बोल् ८६
कञ्चनी रसरङ्गाची खाणी ७२
कन्या सासऱ्यास जाअी ८१
करीत भिरभिर वाहे वारा अखण्ड त्या माळावरती ११४
कल्पना तरल किति ललित नादमाधुरी! ८९
कशासाठी? कोणासाठी? ७४
कशासाठी, पोटासाठी १०६
कशी मजेची वेळा ११८
कां अुठतां? खाली बसा तरुण मण्डळी, ८७
कां अुठतां? बैसा अहो रसिक मण्डळी, १३१
काअू काअू गे ११९
कां नको मधुक्रम आज? ३२
का पापभीरुता हेंच पाप १२८
काय गाअुं? कोठुनि आणूं तुझी रागदारी? १२९
काय लाजरी पोर! खरोखर खुळी लाजरी पोर! ५७

REFBK-0005146

REFBK-0005146